सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/डी२८अे०२१/१/२०२५-डेस्क २८अे(२९३००१) मुंबई, ई स्वाक्षरीत नमुद

संदर्भ :- या कार्यालयाचे क्र.पोमसं/डी२८-अे०३८/१/२०२३-डेस्क२८अे, दि.२४/०२/२०२५ चे पत्र

विषय :- पोलीस कल्याण निधी नियमावली-२०२५ २५% रक्कम पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करणेबाबत.

*****

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन पोलीस कल्याण निधी सुधारित नियमावली -२०२५ मध्ये नियम ८ (अ) व (ब) मध्ये पोलीस घटकांनी चौमाही वर्गणी, विविध उपक्रमातून होणा-या नफ्याची २५% रक्कम व पात्र प्रतिष्ठीत/खाजगी व्यक्ती/संस्था/बहुराष्ट्रीय कंपन्या यांचेकडून स्वेच्छेने देणगी म्हणून रोख स्वरुपात प्राप्त होणा-या रक्कमेच्या २५% रक्कम या कार्यालयास जमा करणेबाबत तरतुद आहे. परंतु ब-याच पोलीस घटकांची २५% रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यात येत नाही.

तरी पोलीस घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, पोलीस कल्याण निधी सुधारित नियमावली -२०२५ मध्ये नियम ८ (अ) व (ब) मधील तरतुदीनूसार सप्टेंबर २०२५ पर्यंतची २५% रक्कम तात्काळ मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यात यावी.

तसेच महासंचालक,लाप्रवि, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके /नाहसं/मबाअप्रवि/रारापोबल/वाहतूक/सायबर/ फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांची व त्यांच्या कार्यालयातील पोलीस कल्याण निधीच्या सर्व सभासदांकडून जमा केलेली माहे सप्टेंबर २०२५ पर्यंतची संपुर्ण (१००%) चौमाही वर्गणी मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 12-10-2025 23:25:11

विपोमनि (प्रशासन), म.राज्य. मुंबई
यांच्या आदेशान्वये

(प्रविण शिखरे)
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक (नि.वे.)
(अति. कार्यभार)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह)

पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे शाखा/दहशतवाद विरोधी पथक /प्रशिक्षण व खास पथके /वाहतूक/ फोर्स वन/मबाअप्रवि/ नाहसं/रा.रा.पो.बल , महाराष्ट्र राज्य, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे

सर्व पोलीस आयुक्त (पुणे शहर / लोहमार्ग मुंबई /अमरावती शहर वगळून)

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल,पुणे व नागपूर

सर्व पोलीस अधीक्षक (अहिल्यानगर/धाराशिव/गडचिरोली/ पुणे लोहमार्ग वगळून)

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र

प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९ (गट क्र.०१/गट क्र.६/गट क्र.८/गट क्र.१० वगळून)

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/डी २८-अे ०३८/१/२०२३-डेस्क २८ अे, मुंबई, दि. ई - स्वाक्षरीत नमुद

संदर्भ :- या कार्यालयाचे ज्ञापन क्र.पोमसं/डी २८ अे ०३८/१/२०२३- डेस्क २८ अे, दि.०४/१०/२०२४

विषय:- पोलीस कल्याण निधी नियमावली सुधारित करणेबाबत.

****

शासनाने गृह विभाग पत्र क्र.पीडब्ल्युएफ-०३७२/३००३५-पोल-७, दि.२२/०२/१९८० अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार, तसेच शासन पत्र, गृह विभाग क्र.संकीर्ण-०४१२/प्र.क्र.२२५/पोल-७, दि.०४/०५/२०१२ अन्वये दिलेल्या सुचनेनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली - १९८० च्या मूळ नियमावलीतील नियमांमध्ये मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या बैठकीतील ठरावानुसार झालेल्या सुधारणांचा समावेश करुन, संदर्भाधिन ज्ञापनान्वये पोलीस कल्याण निधी नियमावली -२०२४ निर्गमित करण्यात आली आहे. सन २०२४ पासून ते आतापर्यत वेळोवेळी झालेल्या सर्व सुधारणांचा व कालपरत्वे झालेल्या बदलांचा समावेश करुन महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीची सुधारित नियमावली - २०२५ तयार करण्यात आली असुन ती सोबत जोडली आहे.

२. सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी नियमावलीतील सर्व नियमांचे तंतोतंत व काटेकोरपणे पालन करावे व त्यानुसार पोलीस कल्याण निधीची उभारणी व विनियोग करावा. तसेच, प्रत्येक चौमाही वर्गणी संबंधितांकडून वेळीच गोळा करुन, एकुण जमा रक्कमेच्या व घटकांद्वारे राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांतील निव्वळ नफयाचे २५ % प्रमाणे येणारी रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी वेळीच या कार्यालयास पाठवावी.

Signed by
Nikhil Jaiprakash Gupta
Date: 24-02-2025 13:00:22

**(मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने)**

**(डॉ. निखिल गुप्ता)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह) (बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल/प्रशिक्षण व खास पथके/लोहमार्ग/फोर्स वन/विशेष कृती/ दहशतवाद विरोधी पथक/वाहतूक/लोहमार्ग/आर्थिक गुन्हे विभाग, म.राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश / मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण / महिला बाल अत्याचार विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.१ ते १९
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र / रा.रा.पो.बल, नानविज, दौंड सह
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर
उच संचालक, गुन्हे प्रशिक्षण केंद्र, नाशिक

प्रत माहितीकरिता,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक (नि.वे.)/(आस्था-१)
पोलीस महासंचालक यांचे सर्व उपसहायक
पोमसं कार्यालयातील सर्व स्वीय सहायक / लघुलेखक
पोमसं कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.१ ते ४४
(त्यांनी उपरोक्त नियमावली सर्व लिपिकांच्या निदर्शनास आणून दयावे.)

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई
२. पोलीस उप अधीक्षक यांनी www.mahapolice.gov.in वर असलेली पोलीस कल्याण निधी सुधारित नियमावली-२०२४ काढून टाकावी व सोबत जोडलेली पोलीस कल्याण निधी सुधारित नियमावली -२०२५ प्रसिध्द करावी.

प्रत सादर अग्रेषित,
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
(लक्षवेध :- कक्ष अधिकारी, गृह विभाग, पोल-७)
२. गृह विभाग, पत्र क्र.संकीर्ण-०४१२/प्र.क्र.२२५/पोल-७, दि.०४/०५/२०१२ ला अनुसरुन.

# महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली

**(सुधारित नियमावली - २०२५)**

**(शासन पत्र, गृह विभाग, क्र.पीडब्ल्यूएफ - ०३७२ / ३००९५ - पोल-७, दि.२२.०२.१९८० अन्वये शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली, १९८० च्या मूळ नियमावलीमध्ये मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या वेळोवेळी झालेल्या सहामाही बैठकीतील निर्णय / शासन आदेश / परिपत्रके या सुधारित नियमावलीमध्ये अंतर्भूत केलेली आहेत.)**

# -: महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली :-

## (सुधारित नियमावली - २०२५)

### अनुक्रमणिका



| अ. क्र. | नियम / उपनियम / परिपत्रक / शासन निर्णय क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | १ | नाव व पत्ता | १ |
| २. | २ | प्रयोजन व उद्दिष्टे | १ |
| ३. | ३ (अ) १ ते ६ (ब) १ ते ३ | सदस्यत्व | १-२ |
| ४. | ४ (१) अ | मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीचे प्रशासन | २ |
| | ४(२) (अ) ते (इ) | समितीचा तपशिल | २-३ |
| | ४(३) (अ) व (ब) | घटक पोलीस कल्याण निधीचे प्रशासन | ३ |
| ५. | ५ (१) एक ते चार व (२) (अ) ते (क) | घटक पोलीस कल्याण निधी सल्लागार समिती | ४-५ |
| ६. | ६ (अ) ते (ड) | वैयक्तिक खातेवही लेखा व तो चालवणे | ५-६ |
| ७. | ७ (अ) ते (फ) | निधीतील वर्गणी | ६-७ |
| ८. | ८ (१) अ ते इ व (२) अ ते क्यू | मध्यवर्ती / घटक पोलीस कल्याण निधीची साधने | ७-१२ |
| ९. | ९ (१) अ ते एन, (२) अ व ब, (३) (४) (४-ब) (५) (६) आणि (७) | मध्यवर्ती / घटक पोलीस कल्याण निधीचा विनियोग | १२-२४ |
| १०. | १० (१) ते (८) अ व ब व (९) | निधीचे लेखे, लेखापरिक्षा, अभिलेख, नोंदवह्या, मानधन इत्यादी | २४-२५ |
| ११. | ११ | पोलीस कल्याण निधी नियम तयार करण्याचे प्राधिकार | २५ |
| १२. | १२ | निरसन व व्यावृत्ती | २५ |
| १३. | परिशिष्ट अ | सदस्यत्व स्वीकृति प्रतिज्ञापत्र | २६ |
| १४. | परिशिष्ट ब | घटक - मागणी नोंदवही | २७ |
| १५. | परिशिष्ट क | पावती | २८ |
| १६. | परिशिष्ट ड | कॅश मेमो | २९ |
| १७. | परिशिष्ट इ | पोलीस कल्याण निधीच्या पैशाची पोचपावती | ३० |
| १८. | शुभेच्छा पत्र | पोलीस महासंचालक यांचे शुभेच्छापत्र. | ३१ |

# -: महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली :-

## (सुधारित नियमावली - २०२५)

**महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र.पीडब्ल्यूएफ-०३७२/३००९५-पोल-७, दि.२२.०२.१९८० अन्वये शासनाने मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी नियमावलीस मान्यता दिलेली आहे.**

**महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली, १९८० च्या मूळ नियमावलीमध्ये आतापर्यंत मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीतील निर्णय / शासन आदेश / परिपत्रके याद्वारे पोलीस कल्याण निधी नियमावलीमध्ये करण्यात आलेल्या सर्व सुधारणा, या सुधारित नियमावलीमध्ये अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.**

**१. नाव व पत्ता :-**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई वगळता महाराष्ट्र राज्याचे पोलीस दलाकरिता **"पोलीस कल्याण निधी"** या नावाचा एक निधी असेल. हा निधी, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गुन्हा अन्वेषण विभाग, आयुक्तालय, जिल्हा, राज्य राखीव पोलीस बल गट, मोटार परिवहन विभाग, बिनतारी संदेश विभाग, प्रशिक्षण संस्था, राज्य गुप्तवार्ता विभाग, दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, विशेष कृती दल, किंवा मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळाचे सल्ल्याने पोलीस महासंचालक ठरवतील, असे व इतर प्रादेशिक पोलीस संघटना / युनिट यांचा समावेश असलेल्या प्रत्येक प्रशासकीय युनिटच्या संबंधात घटक पोलीस कल्याण निधी यांचा मिळून बनविलेला असेल.

**२. प्रयोजने व उद्दिष्टे :-**

पोलीस कल्याण निधी हा कल्याणकारी निधी आहे. केवळ निधीचे सदस्य आणि त्यांचे कुटुंबिय यांच्याच कल्याणासाठी निधीमधील उपलब्ध साधन संपत्तीमध्ये पार पाडल्या जातील, अशा काही उपाययोजना सुरु करणे आणि राबविणे, हे या निधीचे मुलभूत उद्दीष्ट आहे. तसेच परस्परात सहाय्य व सहकार्य करण्याच्या तत्त्वावर निधीचा विनियोग आधारलेला आहे. या प्रयोजनासाठी "कुटुंब" या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र नागरी सेवा - १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम क्र.०९ (१६) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असेल. परंतू या व्याख्ये व्यतिरिक्त सभासदाचा सज्ञान भाऊ हा केवळ पोलीस कल्याण योजनेअंतर्गत मंगल कार्यासाठी हॉलचा लाभ देण्याच्या प्रयोजनार्थ कुटूंबाचा भाग ठरेल.

**३ सदस्यत्व**

**(अ) (१)** पोलीस विभागातील सर्व दर्जाचे पोलीस अधिकारी / कर्मचारी त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून पोलीस कल्याण निधीचे सदस्य आहेत, असे गृहीत धरण्यात येईल.

**(२)** तसेच पोलीस विभागातील कायमच्या नियुक्तीवरील लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी व गट-ड कर्मचारी यांना निधीचे सदस्यत्व ऐच्छिक राहिल व ते त्यांच्या प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून असेल. **(संदर्भ :-** परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिबै/४३९/२००५, दि. १२/०२/२०१५)

**(३)** पुर्ण थकबाकीसह विहित वर्गणी दिल्यानंतरच सदस्यत्व चालू होईल.

**(४)** निधीमध्ये सदस्य म्हणून दाखल होऊ इच्छिणारा शासकिय कर्मचारी, या नियमांना जोडलेल्या परिशिष्ट "अ" अन्वये विहीत केलेल्या प्रपत्रानुसार प्रतिज्ञापत्र लिहून देईल.

**(५)** निधीचा सदस्य पोलीस विभाग सोडून जाईपर्यंत त्याला निधीचा सदस्य म्हणून नाव मागे घेण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**(६)** पोलीस कल्याण निधीच्या सदस्यांची चौमाही वर्गणी त्यांच्या वेतनातून कपात करुन निधीमध्ये जमा करण्यात येईल. [संदर्भ :- परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/ ४९३७/मपोकनिबै/४३९/२००५, दि. ३०/१२/२०१४]

**(ब)** **(१)** पोलीस विभागातील शासकिय कर्मचारी त्या-त्या वेळी ज्या घटकामध्ये त्यांची नियुक्ती झालेली असेल, त्या-त्या घटकांच्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये वर्गणी देईल.

**(२)** दुसऱ्या एखाद्या घटकामध्ये सभासदाची बदली झाल्यास, निधीच्या संबंधात त्याचे काही दायित्व असेल, तर, त्या दायित्वासह त्याचे सदस्यत्व नवीन घटकाच्या निधीमध्ये बदली होईल. अशा दायित्वाची जी रक्कम असेल तेवढी ठोक रक्कम व त्यावरील व्याज नवीन घटकाच्या पोलीस कल्याण निधीमधून जुन्या घटकाच्या पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करुन, दायित्व बदली करण्यात येईल.

**(३)** त्यानंतर, तो सदस्य त्याची बदली ज्या घटकात झालेली असेल, त्या घटकाच्या कल्याण निधीत त्याची अदत्त देय रक्कम देण्यास पात्र ठरेल.

**४.** **<u>निधीचे प्रशासन</u> :-**

**(१)** **(अ)** मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीचे प्रशासन, पोलीस महासंचालक यांचेकडून, निधीच्या धोरणाविषयक निर्देशांच्या अधीनतेत करण्यात येईल. निधी समिती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :-

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | :- | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| **उपाध्यक्ष** | :- | अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| **सचिव व कोषाध्यक्ष** | :- | विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई |
| **सदस्य** | :- | मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या सदस्यांची नियुक्ती, समितीचे अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक हे त्यांचे अधिपत्याखालील घटक प्रमुखांमधून दर २ वर्षांनी करतील. |

**(२)** **समितीचा तपशिल:-**

**(अ)** समितीची सभा आवश्यक असेल त्या-त्या वेळी, परंतु सहा महिन्यांतून निदान एकदा घेण्यात येईल.

**(ब)** समिती, निधीच्या सदस्यांच्या कल्याण कार्याच्या संबंधातील धोरणे, स्थुल मानाने विहीत करतील.

**(क)** अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य हे मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधील निधीच्या रक्कमेचा त्याचप्रमाणे विशेष परिस्थीतीत त्यांना वेळोवेळी आवश्यक वाटेल त्यानुसार कल्याणकारी प्रयोजनासाठी घटक पोलीस कल्याण निधीमधील रक्कमेचा विनियोग करण्यास सक्षम असतील.

**(ड)** (१) **अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य** हे मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधील रक्कम घटक पोलीस कल्याण निधीमध्ये वर्ग करण्यास किंवा एका घटक पोलीस कल्याण निधीमधील रक्कम दुसऱ्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये तात्पुरत्या अथवा कायमस्वरुपी वर्ग करण्यास सक्षम असतील.

**(२) अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य** हे या नियमावली अंतर्गत खर्चाबाबत त्यांना असलेल्या वित्तीय मर्यादेत मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधील निधी घटक पोलीस कल्याण निधीमध्ये वर्ग करण्यास तसेच एका घटक पोलीस कल्याण निधीमधील रक्कम दुस-या घटक पोलीस कल्याण निधी मध्ये तात्पुरत्या अथवा कायमस्वरुपी वर्ग करण्यास सक्षम असतील.

**(इ)** पोलीस परिक्षेत्रातील एका घटकातून दुस-या घटकात निधी वर्ग करण्याचे अधिकार परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उपमहानिरीक्षक तसेच राज्य राखीव पोलीस बलाच्या एका गटातून दुस-या गटात निधी वर्ग करण्यास अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल हे सक्षम असतील. सदर अधिकार पोलीस कल्याण निधी नियमावली अंतर्गत त्यांना दिलेल्या वित्तीय मर्यादेच्या अधिनतेने असतील.

**(३) घटक पोलीस कल्याण निधीचे प्रशासन:-**

**(अ)** घटक पोलीस कल्याण निधीचे प्रशासन, घटक प्रमुखांकडून (महासंचालक, अे.सी.बी., म.राज्य, मुंबई / अ.पो.म.सं , गु.अ.वि., म.रा., पुणे / द.वि.प., म.रा., मुंबई / आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई / सर्व पोलीस आयुक्त, लोहमार्ग सहीत (पो.आ., बृहन्मुंबई वगळून) / सर्व पोलीस अधीक्षक / सर्व समादेशक, रा.रा.पो.बल / मोटार परिवहन विभागाचा प्रभारी पोलीस अधीक्षक / संचालक, पोलीस बिनतारी संदेश किंवा प्रकरण परत्वे, प्रशिक्षण संस्थाचे, प्राचार्य) पोलीस महासंचालक तथा मध्यवर्ती पोलीस कल्याण समितीचे अध्यक्ष यांच्या नियंत्रणाच्या व निर्देशाच्या अधीनतेने करण्यात येईल.

**(ब)** जिल्ह्याच्या आणि राज्य राखीव पोलीस बल गटाच्या घटक पोलीस कल्याण निधीचा कारभार त्या-त्या ठिकाणच्या परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरिक्षक / पोलीस उप महानिरीक्षकांच्या आणि अपर पोलीस महासंचालक , राज्य राखीव पोलीस बलांच्या परिवेक्षीय नियंत्रणाचे अधीन राहील.

**५. <u>घटक पोलीस कल्याण निधी सल्लागार समिती</u> :-**

**(१) पुढील प्रमाणे घटकनिहाय घटक पोलीस कल्याण निधी सल्लागार समितीची स्थापना करण्यात येईल.**

**(एक) अध्यक्ष :-** महासंचालक, अे.सी.बी., महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.राज्य, पुणे,
अपर पोलीस महासंचालक, द.वि.प., म.राज्य, मुंबई
आयुक्त, रा.गु.वि., म.राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक व संचालक, बि.सं.वि., म.राज्य.,पुणे
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सहीत) (पो. आ. बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक आणि म.गु.प्र., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक (मो.प.वि. ),
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह),
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण संस्था.

**(दोन) (अ) सदस्य :-** अपर पोलीस महासंचालक, अे.सी.बी., म.राज्य, मुंबई,
विशेष पोलीस महानिरीक्षक, द.वि.प., म.राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, गु.अ.वि.,पुणे, सह आयुक्त, रा.गु.वि., मुंबई,
आयुक्तालयातील पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) / जिल्हयाच्या मुख्यालयामध्ये अपर पोलीस अधीक्षक / पोलीस उप अधीक्षक (गृह) / उपविभागीय पोलीस अधिकारी - प्रकरणपरत्वे,
सहाय्यक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल,
पोलीस अधिक्षक, मोटार परिवहन / बिनतारी संदेश / उप प्राचार्य पोलीस प्रशिक्षण विद्यालय / केंद्र.

**(ब)** युनिटमधील वरिष्ठतम पोलीस निरीक्षक किंवा वरिष्ठतम फौजदार ते आळीपाळीने प्रत्येकी दोन वर्षाच्या कालावधीकरिता समितीचे काम पाहतील.

**(क)** जिल्हयातील सहाय्यक पोलीस फौजदार ते पोलीस शिपाई पर्यंतच्या हुद्यावरील एक पोलीस कर्मचारी (पोलीस मुख्यालयातील कर्मचारी वगळून).

**(तीन) सदस्य:- <u>घटक पोलीस कल्याण</u>** निधीच्या कार्याचे कामकाज पाहणारे.

**(चार सचिव :-** पोलीस उपमहानिरीक्षक, अे.सी.बी., म.राज्य, मुंबई
पोलीस उपमहानिरीक्षक, द.वि.प., म.राज्य, मुंबई
पोलीस अधीक्षक, गु.अ.वि., म.राज्य., पुणे.
उप आयुक्त (प्रशासन), रा.गु.वि., म.राज्य, मुंबई.
आयुक्तालयातील सहाय्यक पोलीस आयुक्त.
जिल्ह्याचा पोलीस निरीक्षक (कल्याणकारी शाखा/स्थानिक गुन्हे शाखा)
सहाय्यक, राज्य राखीव पोलीस बल.
मुख्यालयाचा पोलीस निरीक्षक.
मोटार परिवहन / प्रशिक्षण संस्थेतील वरिष्ठतम पोलीस निरीक्षक.

**(२)** **(अ)** सल्लागार समितीची बैठक, आवश्यक असेल तेव्हा, परंतु सहा महिन्यातुन किमान एकदा घेण्यात येईल.

**(ब)** प्रशासकाकडुन घटकाच्या निधीचा विनियोग विधायक प्रकारे करण्यासाठी, निधीच्या सदस्याच्या कल्याणाशी संबधीत असलेल्या कोणत्याही सर्व साधारण वा विशेष समस्यांच्या बाबतीत घटकाच्या प्रमुखांना सल्ला देण्यास समिती सक्षम असेल.

**(क)** घटक पोलीस कल्याण निधीचा विनियोग मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधील नियमावलींच्या / तरतुदींच्या अधिन राहुन करण्याची जबाबदारी घटक पोलीस कल्याण निधी सल्लागार समितीची असेल.

**६.** **वैयक्तिक खातेवही लेखा व तो चालवणे :-**

**(अ)** **मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी :-**

**(१)** मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामध्ये चालु खात्यावर ठेवण्यात येईल आणि ती पोलीस महासंचालक / मध्यवर्ती पोलीस कल्याण समितीचे अध्यक्ष यांचेकडून अथवा अध्यक्षांनी प्राधिकृत केल्यास समितीचे सचिवाकडून वैयक्तिक खातेवही लेखा म्हणुन वापरण्यात येईल.

**(२)** मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीचे अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी देतील त्यानुसार त्यातील तेवढी रक्कम राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेत चालु / बचत खात्यावर व आवश्यकतेनुसार मुदत ठेव स्वरुपात गुंतवण्यात येईल.

**(ब)** **घटक पोलीस कल्याण निधी** :-

**(१)** घटक पोलीस कल्याण निधीची रक्कम घटकाच्या मुख्यालयाचे ठिकाणी असलेल्या कोषागारामध्ये ठेवण्यात येईल व निधीच्या प्रशासकाकडून अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून वैयक्तिक खातेवही लेखा म्हणून त्याचा व्यवहार करण्यात येईल.

**(२)** घटक प्रमुख यांना घटक पोलीस कल्याण निधी संबंधित राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेत चालू / बचत खात्यावर व आवश्यकतेनुसार मुदत ठेव स्वरुपात ठेवण्याची मुभा राहील. (संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिधी(मुदतठेव)/१५५/२०१३, दि.१४/०२/२०१४) तथापि, त्यातील निधीच्या वापरामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता होऊ नये याची घटक प्रमुख दक्षता घेतील. अन्यथा संभाव्य अनियमिततेस संबंधीत घटक प्रमुख सर्वस्वी जबाबदार राहतील.

**(क)** मात्र, मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी किंवा घटक पोलीस कल्याण निधी अथवा त्यातील कोणतीही रक्कम पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे या बाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी देतील, त्यानुसार अशा रीतीने ठेवण्यात किंवा गुंतवण्यात येईल.

**(ड)** ज्या अधिका-यांच्या नांवाने वैयक्तिक खातेवही लेखा सुरु करण्यात आला असेल, तो त्याच्या पदीय नात्याने त्या संबंधातील व्यवहार करील.

असा प्राधिकारी, त्याला पदीय नात्याने दुय्यम असलेल्या व्यक्तीकडे निधीच्या प्रशासनाच्या प्रयोजनासाठी एखादे काम सोपवू शकेल आणि निधीच्या प्रशासनाच्या संबंधात अशाप्रकारे काम सोपविलेल्या व्यक्ती ती कामे त्याच्या पदीय नात्याने करतील.

**७ निधीतील वर्गणी :-**

**(अ) निधीच्या सदस्याकडून देय असलेल्या वर्गणीचा दर पुढील प्रमाणे असतील :-**

| अ. क्र. | पदनाम | पोलीस कल्याण निधी, चौमाही वर्गणीच्या रकमेचे कालावधीनिहाय दर रुपये | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३/९८ पर्यंत | ४/९८ ते ८/११ पर्यंत | ९/२०११ ते ८/२०१३ पर्यंत | ९/२०१३ ते १२/२०१६ पर्यंत | १/२०१७ ते ०३/२०२३ पर्यंत | ०४/२०२३ पासून |
| १. | पोलीस महासंचालक / अपर पोलीस महासंचालक | ४०.०० | १००.०० | २००.०० | ५००.०० | ७५०.०० | १०००.०० |
| २. | विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उपमहानिरीक्षक/ पोलीस अधीक्षक | २०.०० | ७५.०० | १५०.०० | ३५०.०० | ६००.०० | ७५०.०० |
| ३. | पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त | १३.५० | ५०.०० | १००.०० | २५०.०० | ४००.०० | ६००.०० |
| ४. | पोलीस निरीक्षक / सहायक पोलीस निरीक्षक / पोलीस उपनिरीक्षक | १२.०० | ३०.०० | ६०.०० | १५०.०० | २५०.०० | ४००.०० |
| ५. | सहायक पोलीस उप निरीक्षक ते पोलीस शिपाई | ०४.०० | २०.०० | ४०.०० | १००.०० | १५०.०० | २५०.०० |
| ६. | पोलीस महानिरीक्षक यांचे वरिष्ठ उपसहायक (गट-अ) | १७.०० | ७५.०० | १५०.०० | ३५०.०० | ६००.०० | ७५०.०० |
| ७. | पोलीस महानिरीक्षक यांचे उपसहायक (गट-ब) | १३.५० | ५०.०० | १००.०० | २५०.०० | ४००.०० | ६००.०० |
| ८. | प्रशासकिय अधिकारी / वरिष्ठ कार्यालय अधीक्षक/ कार्यालय अधीक्षक / लघुलेखक | १२.०० | ३०.०० | ६०.०० | १५०.०० | २५०.०० | ४००.०० |
| ९. | प्रमुख लिपीक / लिपीक कर्मचारी / कार्यालयीन शिपाई व स्वच्छक (गट - ड) | ०८.०० | २०.०० | ४०.०० | १००.०० | १५०.०० | २५०.०० |

(संदर्भ :- परिपत्रक क्र. पोमसं/ २८-ओ/ ४९३७/ मपोकनिस बैठक /४३९ (०५)/ २०१६, दि. २६/१२/२०१६)
(परिपत्रक क्र. पोमसं/ २८-ओ/ ४९३७/ मपोकनि-बैठक/४३९/२००५, दि.१३/०४/२०२३ नुसार घेतलेला निर्णय)

**(ब)** (१) वर्गणीच्या वसुलीच्या संबंधात, परिशिष्ट ''ब'' नमुना एक प्रमाणे, मागणी नोंदवही ठेवण्यात येईल.

(२) वर्गणी वसुल करणारा अधिकारी, वसुल केलेली रक्कम, ती ज्या कालावधीच्या संदर्भातील असेल, त्या कालावधीसाठी मागणी नोंदवहीच्या सत्य प्रतिसह परिशिष्ट ''ड'' नमुन्यात ठेवण्यात येईल.

व रोखीच्या पावतीसह घटक पोलीस कल्याण निधीच्या प्रशासकाकडे पाठवील.

**(क)** (१) घटक कल्याण निधीचा प्रशासक, परिशिष्ट ‘‘इ’’ नमुन्यात, त्या रकमेची पोचपावती देईल.

(२) निरीक्षण अधिकारी, वार्षिक तपासणीच्या वेळी मागणी नोंद वहीची तपासणी करिल आणि वसुली अचुकपणे करण्यात येत असल्याची खात्री करुन घेईल.

**(ड)** छापील पावती पुस्तके व रोखीची पुस्तके वापरण्यात येतील आणि छपाई खर्च निधीमधून करण्यात येईल.

**(इ)** एखाद्या सदस्याची एका घटकामधून दुसऱ्या घटकामध्ये बदली झाल्यास, त्याने त्याच्या जुन्या निधीमध्ये वर्गणी भरलेली असेल तर त्याने त्या कालावधीसाठी पुन्हा वर्गणी देणे आवश्यक असणार नाही.

**(फ)** सभासदांच्या चौमाही वर्गणीची कपात त्यांच्या एप्रिल, ऑगस्ट व डिसेंबर या महिन्याच्या वेतनातून करण्यात येईल.

**८. निधीची साधने:-**

(१) **मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी पुढील उपक्रमांद्वारे उभारण्यात येईल.**

**(अ)** (१) घटक पोलीस कल्याण निधीअंतर्गत पोलीस घटकांतून सांस्कृतिक कार्यक्रम, इंधन आगारे (पेट्रोलपंप), मंगल कार्यालये, विश्रांतीगृहे, पोलीस क्लब, लॉन, बोटींग क्लब, वस्तुभांडार, सैन्य दलाच्या धर्तीवरील पोलीस कॅन्टीन सुविधा, पोलीस पब्लीक स्कुल, कुक्कुट पैदास क्षेत्रे, दुग्धशाळा, पिठाच्या गिरण्या, बेक-या, धान्य व किराणा मालाची दुकाने, गॅस एजन्सी, अे.टी.एम., जाहिरात फलक व बागा मळे इत्यादि उपक्रम राबविण्यात येतील.

सदर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतून होणाऱ्या नफ्याच्या २५% रक्कम घटकातून मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी उपलब्ध करून देतील.

(२) घटक पोलीस कल्याण निधीमध्ये निधीच्या सदस्याकडुन गोळा करण्यात आलेल्या एकूण चौमाही वर्गणीच्या रक्कमेच्या २५% रक्कम घटकातून मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी उपलब्ध करून देतील.

(३) घटक कार्यालयास पोलीस कल्याण निधी उपक्रमांतर्गतच्या कोणत्याही उपक्रमांसाठी, पात्र प्रतिष्ठीत / खाजगी व्यक्ती / संस्था / बहुराष्ट्रीय कंपन्या यांचेकडून स्वेच्छेने देणगी म्हणून रोख स्वरुपात प्राप्त होणाऱ्या रक्कमेच्या,

तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या (पोमसं / शासन) पुर्वमान्यतेने घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यात येणाऱ्या रक्कमेच्या २५% रक्कम घटकातून मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी उपलब्ध करून देतील.

**(ब)** पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई, अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती/ प्रशिक्षण/ रारापोबल/ वाहतूक/ लोहमार्ग/ फोर्स वन, मुंबई.) यांनी त्यांची आणि त्यांच्या कार्यालयातील पोलीस

कल्याण निधीच्या सर्व सभासदांकडून मिळालेल्या संपुर्ण (१००%) चौमाही वर्गण्या मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी उपलब्ध करून देतील.

**(क)** महाराष्ट्र शासनाकडुन मिळालेले अनुदान.

**(ड)** पोलीस अधिकारी व इतर शासकिय कर्मचारी यांचेकडील देणग्या.

**(इ)** निगम निकाय, सार्वजनिक संस्था, औद्योगिक व वाणिज्य केंद्रे, लायन्स क्लब, इत्यादी सारख्या सामाजिक संघटना व खाजगी व्यक्ती यांच्याकडुन या नियमातील (ब) मधील नमूद कार्यालयांना प्राप्त होणाऱ्या देणग्या.

**(२) घटक पोलीस कल्याण निधीअंतर्गत खालील उपक्रम राबवून त्याव्दारे निधी उभारला जाईल :-**

**(अ)** **(१)** सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक (रा.रा.पो.बलसह) यांनी त्यांची व त्यांच्या कार्यालयातील पोलीस कल्याण निधीच्या सभासदांकडुन पो.क.निधीची वर्गणी जमा करुन, त्यांचे कार्यालय ज्या ठिकाणी कार्यरत असेल, त्या ठिकाणच्या किंवा नजीकच्या त्याच्या अधिपत्याखालील एका घटक कार्यालयातील घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करतील.

**(२)** राज्यातील पोलीस विभागातील गु.अ.वि., व रा.गु.वि., पथक प्रमुखांनी त्यांची व त्यांचे कार्यालयातील पोलीस कल्याण निधीच्या सभासदांकडून अदत्त चौमाही वर्गणी जमा करुन, जमा रक्कम, त्यांचे कार्यालय ज्या जिल्ह्यात कार्यान्वित आहे, अशा आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त आणि जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक यांना त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीत जमा करण्यासाठी पाठवतील.

ते घटक सदरची रक्कम स्वत:चे घटक कल्याण निधीत जमा करुन, त्यातील २५% रक्कम मध्यवर्ती पो.क.नि.मध्ये जमा करण्यासाठी पो.म.सं. कार्यालयास पाठवतील.

घटक कार्यालय हे त्यांच्या घटकांतील अधिकारी/ कर्मचारी यांना पो.क.नि.अंतर्गत अनुज्ञेय लाभ उपलब्ध करुन देतील.

**(ब)** पोलीस सहकारी पत संस्थाकडील निव्वळ नफ्याच्या २०% ची रक्कम.

**(क)** **घटक पोलीस कल्याण निधीअंतर्गत** पोलीस घटकांतून सांस्कृतिक कार्यक्रम, इंधन आगारे (पेट्रोलपंप), मंगल कार्यालये, विश्रांतीगृहे, पोलीस क्लब, लॉन, बोटींग क्लब, वस्तुभांडार, सैन्य दलाच्या धर्तीवरील पोलीस कॅन्टीन सुविधा, पोलीस पब्लीक स्कुल, कुक्कुट पैदास क्षेत्रे, दुग्धशाळा, पिठाच्या गिरण्या, बेक-या, धान्य व किराणा मालाची दुकाने, गॅस एजन्सी, अे.टी.एम., पोलीस कर्मचारी सहकारी पथसंस्था, जाहिरात फलक व बागा मळे इत्यादि उपक्रम राबविण्यात येतील.

सदर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमधून मिळणाऱ्या एकूण निव्वळ नफ्याच्या ७५% इतकी रक्कम घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा होईल व उर्वरित २५% रक्कम मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी उपलब्ध करून दिली जाईल.

**(ड)** अधिकाऱ्यांचे क्लब असल्यास, त्यांच्याकडील वर्गणी.

**(इ)** क्रिडा महोत्सवात व स्पर्धामध्ये युनिट भाग घेते, तेव्हा मिळतील ती रोख पारितोषिकांच्या रकमेपैकी

१०% रक्कम (८०% खेळाडू, १०% मध्यवर्ती पोलीस क्रीडा निधी)

( संदर्भ :- परिपत्रक क्र. पोमसं/२८/६९०९/बक्षिस रक्कम/२०१/२०१५, दि.०५/०९/२०१५)

**(फ)** पोलीस अधिकारी व इतर शासकिय कर्मचारी यांचेकडील देणग्या.

**(ग)** **देणगी:-**

**(१)** **देणगी स्विकारण्याकरिता अधिकार प्रत्यायोजन:-**

महाराष्ट्र शासन, गृहविभाग क्र.पीडब्ल्यूएफ ०४०१/३१९/प्र.क्र.३/पोल-७, दि.१४/०३/२००८ च्या शासन निर्णयान्वये पोलीस कल्याण निधी नियमातील नियम क्र. ८ मधील तरतुदीनुसार यापुढे खाजगी संस्था/ बहुराष्ट्रीय कंपन्या तसेच खाजगी व्यक्तींकडून, पोलीस महासंचालक यांचे पूर्वपरवानगीने रू.५,००,०००/- (रूपये पाच लाख मात्र) पर्यंत देणगी स्विकारण्याचे अधिकार क्षेत्रिय अधिकाऱ्यांना प्रदान करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

त्यानुसार पोलीस महासंचालक यांनी सर्व परिक्षेत्रिय वि.पो.म.नि. / सर्व परिक्षेत्रिय पो.उ.म.नि. तसेच पो.उ.म.नि./ वि.पो.म.नि./ अ.पो.म.सं. दर्जाचे आयुक्त/ अ.पो.म.सं., रा.रा.पो.बल, अ.पो.म.सं., प्रशिक्षण व खास पथके यांना रू.५,००,०००/- (रूपये पाच लाख मात्र) पर्यंत धनादेश / धनाकर्ष स्वरूपात तसेच वस्तू स्वरूपात जागा, ॲम्बूलन्स, संगणक व इतर विद्युत उपकरणे, वाहन इत्यादी स्वरूपातील देणग्या स्विकारण्याचे अधिकार प्रत्यायोजीत करण्यात आलेले आहेत.

(संदर्भ:- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अ/४९३७/दे.अ.प्रत्यायोजन/१५४/२०१७,दि.२१/०७/२०१७ तसेच समक्रमांकित, दि.२३/०६/२०२२).

**(२)** **<u>जास्त रक्कमेच्या देणग्या</u>**:-

**अ)** पोलीस कल्याणकारी योजनांकरिता रू.५,००,०००/- (रूपये पाच लाख मात्र) पेक्षा जास्त रक्कमेचे धनादेश / धनाकर्ष स्वरूपातील देणग्या, वस्तू स्वरूपातील देणग्या शासनाच्या पूर्व परवानगीने स्विकारण्यात येतील.

**ब)** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या पूर्व मान्यतेने कोणत्याही कंपनीकडून / नामांकित ट्रस्टकडून त्यांच्या सामाजिक दायित्व निधी (Corporate Social Responsibility) मधून पोलीस कल्याणकारी योजनांकरिता निधी घेता येईल. तसेच इमारती बांधकाम अथवा साहित्य सामुग्री स्वरुपात मदत घेता येईल.

**(३)** **<u>स्विकारता न येणाऱ्या देणग्या</u>** :-

पोलीस विभागातील कामाशी संबंधित येणारे बिल्डर / विकासक / बांधकाम कंत्राटदार / इन्फ्रास्ट्रक्चरर्स तसेच बांधकामाशी संबंधित वाळू सिमेंट इत्यादिंचे विक्रेते / पुरवठादार, मद्य उत्पादक व विक्रेते / वाईन शॉप / बार / हॉटेल / रेस्टॉरंट ॲण्ड बार / इत्यादिंचे मालक, गुटखा / तंबाखु / सिगारेट / इत्यादिंचे उत्पादक व विक्रेते व तत्सम व्यावसायीकांकडून देणग्या स्विकारता अथवा प्रस्तावित करता येणार नाहीत. तसेच रु. १०,०००/- पेक्षा कमी रकमांच्या देणग्याही स्विकारता अथवा प्रस्तावित करता येणार नाहीत. (संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अ/४९३७/देणगी/१५०/२०१२, दि.११/१०/२०१२ व क्र पोमसं/२८-अे/ ४९३७/पोकनि-देणगी ५३/२०१३, दि. १५/०५/२०१३)

**(ह)** पोलीस महासंचालक यांनी प्रत्यावर्तीत केलेल्या अधिकारानुसार पुर्व परवानगीने निधी स्विकारणे व विनियोग करण्यासंबंधी शासनाने तयार केलेल्या नियमांच्या अधिनतेने कोणत्याही अन्य मार्गाने मिळालेल्या रक्कमा स्विकारण्यात येतील.

**(आय)** गुन्ह्याचा शोध लावणे, संपत्ती परत मिळवून देणे, इत्यादीसाठी खाजगी व्यक्तींनी दिलेली व पोलीस महासंचालक यांच्या मंजूरीच्या अधीनतेने स्विकारलेली, पैशाच्या स्वरूपातील बक्षिसे स्विकारण्यात येतील.

**(जे)** निधीमध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यास घटक प्रमुखांच्या स्वेच्छा निर्णयानुसार पोलीस बँड भाडयाने देवून मिळलेल्या रक्कमेच्या २५% इतकी रक्कम स्विकारण्यात येईल.

**(के)** कल्याण निधीच्या रक्कमेच्या पोलीस महासंचालक यांनी प्राधिकृत केलेल्या गुंतवणुकांवरील व्याजाच्या रक्कमेद्वारे मिळणारा महसूल स्विकारण्यात येईल.

**(एल)** घटक कल्याण निधीला त्यांच्या गरजेनुसार व उपलब्धतेनुसार मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीतून उपक्रमाकरिता येणाऱ्या एकुण खर्चाच्या २५% रक्कम अनुदान किंवा अग्रीम स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येईल. (पोलीस क्लब, विश्रामगृह, वसतीगृह, बहुउद्देशीय सभागृह इत्यादि उपक्रमाकरिता) (संदर्भ:- परिपत्रक क्र. पोमसं/ २८-अे/४९३७/क.उ.निधी/११९/ २०११, दि.०५/११/२०११)

**(एम)** शामियाने व बहुद्देशीय सभागृहे, विश्रामगृहे, पोलीस क्लब, हॉलिडे होम इत्यादी सारखा पोलीस कल्याण इमारती यांच्या भाडयातून मिळालेली रक्कम, मात्र, या सुखसोयीसाठीचे भाडे निधीच्या सदस्यांकडून कमी केलेल्या दरांनी घेता येईल.

**(एन)** **<u>सांस्कृतिक कार्यक्रमांतून मिळणारे उत्पन्न</u>:-**

**पुढील शर्तीच्या अधीनतेने** आयोजित केलेले चित्रपट, नाटक, सर्कस, कुस्ती सामने, फुटबॉल, हॉकी किंवा क्रिकेट सामने किंवा अन्य कोणताही हितार्थ कार्यक्रम (तिकीट, देणगीदार, प्रायोजकत्व इ. ) यापासून मिळालेले उत्पन्न.

**(१)** तिकीट विक्रीबाबत कोणताही शासकिय दबाव आणला जाणार नाही.

**(२)** खेळाचे प्रवेश दर, ज्या ठिकाणी हे खेळ आयोजित केले असतील तेथील चित्रपटगृहांच्या प्रवेशदराच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाहीत आणि कोणत्याही परिस्थितीत ते दर प्रत्येक तिकीटास रूपये १,०००/- याहून अधिक असणार नाहीत. विशेष सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हे दर प्रत्येक तिकीटामागे रूपये १,५००/- पर्यंत वाढविता येईल. **(संदर्भ :- परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/सां.का.-तिकिटदर/५६/२०१७, दि.१७/४/२०१७)**

**(३)** पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती लोकांना तिकीटे विकत घेण्यास सांगण्यासाठी घरोघरी जाणार नाही. मानार्थ तिकीटांच्या (Passes) बदल्यात कोणत्याही देणग्या मागितल्या जाणार नाहीत.

**(४)** वर उल्लेखलेले खेळ/कार्यक्रम जेथे होणार असतील, त्या ठिकाणाहून अतिशय दूर असलेल्या कोणत्याही पोलीस ठाण्याकडे तिकीटे विकण्याचे काम दिले जाणार नाही. तसेच ट्रक ड्रायव्हर

आणि बेकायदेशीर व्यावसाईकांकडुन कोणत्याही प्रकारचा निधी स्वीकारु नये. दोन कार्यक्रमांच्या आयोजनांमध्ये किमान एक वर्षाच्या कालावधीचे अंतर असणेही आवश्यक आहे. पोलीस दलातील व्यक्तींना स्वत: नाटकाच्या प्रयोगात भाग घेता येईल. परंतु अशा प्रयोगामुळे त्यात भाग घेणाऱ्या व्यक्तींच्या कामामध्ये अडथळा येता कामा नये.

अशा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील त्यासाठी पोलीस महासंचालक यांचे परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/कार्यक्रम परवानगी/३४/२०११, दि.१८/०३/२०११ मधील नमूद बाबींच्या पुर्ततेसह परिपूर्ण प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

**(ओ) पेट्रोल पंप व गॅस एजन्सी :-**

**पोलीस कल्याण निधीचा एक आर्थिक स्त्रोत म्हणून राज्यातील पोलीस घटकांमध्ये घटक पोलीस कल्याण निधीमार्फत पोलीस महासंचालक यांच्या पुर्व मंजुरीने खालील अटीच्या अधीन राहून पेट्रोल पंप / गॅस एजन्सी सुरु करता येतील.**

**(१)** पेट्रोल पंप / गॅस एजन्सीसाठी जागा पोलीस विभागाच्या मालकीची असेल, कुठेही भाडेतत्वावर जागा देण्यात येऊ नये. तसेच जागेचा ७/१२ चा उतारा व जागेचा नकाशा सादर करणे आवश्यक राहील.

**(२)** पेट्रोल पंप / गॅस एजन्सी उभारणीचा सर्व खर्च संबंधित पेट्रोलियम / गॅस एजन्सी कंपनीकडून करण्यात येईल. तथापि, पेट्रोल पंपासाठी पेट्रोल, डिझेल व इतर पेट्रोलियम पदार्थ खरेदीसाठी लागणारी सुरुवातीची रक्कम घटक पोलीस कल्याण निधीमधून खर्च करण्यात येईल. (संदर्भ:- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/पे.पंप परवानगी/२३८/२०१६, दि.०७/१२/२०१६)

**(पी) एटीएम मशिन:-**

पोलीस विभागाच्या जागेमध्ये विविध बँकेची अे.टी.एम. मशिन खालील अटींच्या अधिन राहून बसविण्यात येतील.

**(१)** एटीएम मशीन हे पोलीस कार्यालये, पोलीस स्टेशन इमारत व परिसर वगळून पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन्स, रारापोबल गटाच्या आवारात तसेच, पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या आवारामध्ये रस्त्याच्या बाजुला बसविता येईल.

**(२)** एटीएम मशीन बसविण्यासाठी संबंधित बँकाकडून घटक पोलीस कल्याण निधीसाठी भरीव आर्थीक मोबदला तसेच इतरही कल्याणकारी / सुधारणाविषयक बाबींची पुर्तता होईल हा दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून तसे प्रस्ताव पोलीस महासंचालक यांच्या पुर्व मान्यतेसाठी वेळच्या वेळी सादर करावेत.

**(३)** एटीएम मशीनच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस विभागाची नसेल, ती संबंधित बँकांची जबाबदारी असेल.

**(४)** एटीएम मशीन बसविण्यासाठी स्थानिक नगरपालिका/ महानगरपालिका यांचे कर, तसेच

इतर संबंधित कर भरण्याची जबाबदारी संबंधित बँकांची, अथवा पोलीस घटक प्रमुखाची असेल.

**(५)** एटीएम मशीन लावण्यासाठी संबंधित बँकांकडून भाड्यापोटी प्राप्त होणा-या रकमेतून सर्व सबंधित कर (भरावे लागत असतील तर) वजा करुन उर्वरित रकमेच्या २५% रक्कम धनादेश / धनाकर्षाद्वारे मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये भरण्यासाठी नियमितपणे पाठविण्यात येईल. (संदर्भ :- परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक/ एटीएममशिन/४३९(०५)/२०१६, दि. २६/१२/२०१६)

**(क्यु) जाहिरात फलक** :-

पोलीस महासंचालक यांच्या पुर्व परवानगीने पोलीस विभागाची जागा पुढील अटींच्या अधिन राहून जाहिरात कंपन्यांना भाडे तत्वावर देता येतील.

**(१)** जाहिरातीचे फलक / होर्डींग पोलीस घटक कार्यालयासमोर, किंवा पोलीस विभागाच्या कोणत्याही कार्यालयासमोर, तसेच पोलीस ठाण्याच्या आवारात लावू नये. तथापि, रारापोबल गट, पोलीस प्रशिक्षण कार्यालयाच्या आवारात पोलीस लाईनमध्ये रस्त्यालगतच्या भागात लावण्यास हरकत नाही.

**(२)** जाहिरातीचे फलक / होर्डींग लावतांना ते कोणत्याही वर्ज्य पदार्थांबाबत, अश्लिल स्वरुपाचे, तसेच राजकिय पक्षाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध येणारे नसावेत.

**(३)** जाहिरात / होर्डींग्ज मधील विषय जनक्षोभास कारणीभूत होणारे नसावेत.

**(४)** जाहिरात/ होर्डींग्ज लावण्यापूर्वी / संबंधित प्रकाशक / वितरकाशी करार करण्यापूर्वी त्याबाबतची सविस्तर माहिती उदा. जाहिरात / होर्डींग लावण्याचे ठिकाण, जाहिरात / होर्डींगचा प्रकार (विषय) यापासून मिळणारे वार्षिक भाडे इ. नमूद करुन त्यासाठी पोलीस महासंचालकांची पूर्व मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव योग्य मार्फतीने सादर करावेत.

**(५)** जाहिरात / होर्डींग लावण्यासाठी स्थानिक नगर पालिका / महानगरपालिका यांचे कर तसेच इतर संबंधित कर भरण्याबाबतची जबाबदारी संबंधित घटकांची किंवा वितरक / प्रकाशकांची असेल.

**(६)** जाहिरात / होर्डींगच्या भाडयापोटी मिळणा-या रकमेतून सर्व संबंधित कर वजा करुन उर्वरित रकमेच्या २५% रक्कम धनादेश / धनाकर्षाद्वारे मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये भरण्यासाठी निश्चितपणे पाठवावी.(संदर्भ :-परिपत्रक क्र. पोमस/२८-अे/ ४९३७/होर्डींग/पुणे ग्रा./८०/ २०१६, दि. २८/०९/२०१६)

## ९. निधीचा विनियोग :-

**(१) पोलीस कल्याण निधी पुढील कारणांसाठी वापरण्यात येईल.**

**(अ) आरोग्यविषयक बाबींकरिता:-**

ज्या खालील नमूद वैद्यकीय बाबींकरिता शासकीय रूग्णालयातून सुविधा पुरविल्या जात नाहीत त्याकरिता पोलीस कल्याण निधीच्या सभासदास फक्त एकदाच संबंधित घटक पोलीस कल्याण निधीतून रू.५,०००/-फक्त (रु. पाच हजार फक्त.) अनुदान म्हणून मंजूर करण्यात येईल.

**(१)** जी औषधे पुरविली जात नाहीत, अशी विशेष औषधे, औषधीद्रव्ये इत्यादी.

**(२)** अर्धांगवायू, पोलियो, कर्करोग, इत्यादीसारख्या विशिष्ट वर्गातील रोग बरे होण्याकरीता लागतील, अशी इतर उपयंत्र किंवा उपकरण संच.

**(३)** शासकिय कर्मचा-यांना द्यावयाच्या वैद्यकिय उपचारासाठींच्या त्यावेळी अंमलात असलेल्या नियमानुसार ज्यांच्या खर्चाची प्रतिपूर्ती केली जात नाही अशी श्रवणयंत्रे व दाताची कवळी इत्यादी सारखी उपयंत्रे. (संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक-अनु./४३९/२००५, दि.२७/०२/२०१३ व दि.१४/०६/२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पोमसं/डी २८ अे/०३८/१/२०२४, दि.०५/०७/२०२४.)

**(४)** चष्म्याकरिता कमाल रु.५००/- इतके देण्यात येणारे अनुदान यापुढे रद्द करण्यात येत आहे. (संदर्भ:-परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक-पु.अनुदान/४३९/०५, दि.१६/०३/२२)

**(अ)(१) <u>विशेष पोषण आहार / सुदृढ बालिका अनुदान :-</u>**

पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या महीला पोलीस शिपाई ते महीला पोलीस निरीक्षक तसेच महीला लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट-ड च्या महिला कर्मचारी यांना पहिल्या प्रसुतीच्या काळात तीचा व तीच्या होणाऱ्या बाळाच्या आरोग्याचा दर्जा वाढविण्याच्या हेतुने पोलीस कल्याण निधीतून रक्कम रू.५०००/- (रूपये पाच हजार मात्र) इतके "**विशेष पोषण आहार अनुदान**" देण्यात येईल.

तसेच जन्मास आलेले अपत्य हे मुलगी असल्यास बेटी बचावच्या पार्श्वभूमीवर व मुलीचा जन्मदर वाढण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तीच्या पोषणासाठी देखील वरील अनुदानाव्यतिरिक्त रुपये ५,०००/- इतके "**सुदृढ बालिका अनुदान**" देण्यात येईल. (संदर्भ:- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अ/ ४९३७/महिला पोलीस- विशेष पोषण अनुदान/३३(०२)/२०१८, दि.२३/०२/२०१८ व क्र. पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक-पु.अनुदान/४३९/०५, दि.१६/०३/२०२२)

**(ब) <u>पुस्तक अनुदान</u>** :-

खालील नमूद पोलीस कल्याण निधी सभासदांच्या पाल्यांना खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याने पाठयपुस्तक अनुदानाची सुविधा, ज्या शैक्षणिक वर्षात लागू होत असेल, त्यांच्या लगतपूर्वीच्या वार्षिक परिक्षेत विवरणपत्रातील नमूद दरानुसार "**पुस्तक अनुदान**" दिले जाईल. (संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/ २८-अे/४९३७/मपोकनि-बैठक-पु.अनुदान/४३९(०५)/२०१५, दि.०७/०४/२०१६ नुसार)

**(१)** पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक तसेच लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट-ड चे कर्मचारी यांचे २ मुला- मुलींना "**पुस्तक अनुदान**" दिले जाईल.

**(२)** राज्यातील विविध नक्षलवादी / अतिरेकी हल्ल्यातील शहिद पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची २ मुला- मुलींना "**पुस्तक अनुदान**" दिले जाईल. (संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/ मपोकनिस बैठक-पु.अ./४३९/२००५, दि.२७/०२/२०१३)

**(३)** राज्य पोलीस विभागात सेवेत असतांना कोणत्याही दिवंगत झालेल्या पोलीस अधिकारी /

कर्मचा-यांच्या २ पाल्यांना त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत, पदवी / इयत्ता १२ वी नंतर फक्त ३ वर्षापर्यंतच्या कोणत्याही अभ्यासक्रमासाठी "**पुस्तक अनुदान**" दिले जाईल.

मात्र, पुस्तक अनुदान मंजूरीसाठी गुणपत्रकाची साक्षांकित प्रत निकालाच्या तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील. (संदर्भ :- परिपत्रक क्र. पोमसं/२८-ओ/४९३७/मपोकनिबै/४३९/(०५)/२०१५,दि. २५/८/२०१५) तसेच प्रत्येक घटकांनी पुस्तक अनुदान मंजूर करतांना त्याबाबतची स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक राहील.

**पुस्तक अनुदानाकरिता आवश्यक गुण व दरांचे विवरणपत्र**

(**संदर्भ :-** परिपत्रक क्र.पोमसं/२८-ओ/४९३७/मपोकनिसबैठक-पु.अनुदान/६१/२०२२, दि.१२/०५/२०२२ व क्र.DGP-D२८A०१६/८/२०२४-DESK २८A (ई-१५९९४३), दि.१९/१२/२०२४.)

| अ.क्र. | शैक्षणिक अभ्यासक्रम | टक्केवारी | पुस्तक अनुदानाचे दर २०२४-२५ पासून रुपये |
|---|---|---|---|
| १. | इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत | ८५% किंवा प्रमुख ६ विषयांपैकी ३ विषयांमध्ये किमान अ-२ श्रेणी | २,०००/- |
| २. | इयत्ता ११ वी व १२ वी. | ८०% | ३,५००/- |
| ३. | वरिष्ठ महाविद्यालय/ पोस्ट ग्रॅच्युएट (आर्टस / कॉमर्स / सायन्स) D.Ed., B.Ed., B.Sc Agri., BCA, MCA, MSW, Diploma in Pharmacy, Hotel Management. | ७०% | ४,१२५/- |
| ४. | अभियांत्रिकी पदविका (Diploma) | ६५% | ४,१२५/- |
| ५. | वैद्यकीय पदविका (Diploma) D-Pharm | ६५% | ४,१२५/- |
| ६. | अभियांत्रिकी पदवी (Degree) BE पदव्युत्तर पदवी (ME) | ६५% | ९,६२५/- |
| ७. | वैद्यकीय / पशुवैद्यकीय पदवी / B- Pharm / M- Pharm (Degree), पदव्युत्तर पदवी. | ६५% | १९,८००/- |

**टिप:-** विवरणपत्रातील अ.क्र.३ ते ७ वरिल अभ्यासक्रमांकरिता शैक्षणिक वर्षाच्या प्रत्येक वर्षी पुस्तक अनुदान देय राहील.

**(ब)(१) दप्तर अनुदान** :-

राज्यातील सर्व पोलीस घटकांतील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या पोलीस कर्मचा-यांच्या **तसेच लिपिक वर्गीय (कनिष्ठ श्रेणी लिपिक ते प्रमुख लिपिक) ते वर्ग-४ कर्मचा-यांच्या** इयत्ता ५ ते १० पर्यंतचे शिक्षण घेत असलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या २ मुलींना सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासुन संबंधित घटकाच्या पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी रु.१,०००/- वार्षिक या दराने शैक्षणिक प्रोत्साहन म्हणनू दप्तर अनुदान देण्यात येईल.

(संदर्भ:- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अ/४९३७/वा.शै.अनुदान/वर्ग-ड ते वश्रेलि/९२/२०१७, दि.२७/१०/२०१७ आणि क्र. पोमसं/२८-ओ/४९३७/मपोकनिस बैठक-पु.अनुदान/४३९/२००५, दि.१६/०३/२०२२)

**(ब)(२) उच्चशिक्षणाकरिता "शिष्यवृत्ती अनुदान" (स्कॉलरशीप):-**

पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट-ड चे कर्मचारी यांच्या दोन पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून खालील नमूदप्रमाणे **"शिष्यवृत्ती अनुदान" (स्कॉलरशीप)** देण्यात येईल:-

**(१)** १. भारतीय अभियांत्रिकी संस्था (IIT), २) भारतातील कोणतेही वैद्यकिय महाविद्यालय **(M.B.B.S.)** जेथे सामायीक प्रवेश परिक्षेद्वारे प्रथम प्रवेश घेतलेल्या पाल्यास रु.१,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) इतकी रक्कम **"शिष्यवृत्ती अनुदान" (स्कॉलरशीप)** म्हणून देण्यात येईल.

सदर रु.१,००,०००/- (रूपये एक लाख मात्र) अनुदानापैकी रुपये ५०,०००/- (रूपये पन्नास हजार मात्र) इतकी रक्कम धनादेशाद्वारे प्रथमवर्षी व उर्वरित रु.५०,०००/- (रूपये पन्नास हजार मात्र) इतकी रक्कम धनादेशाद्वारे दुसऱ्या वर्षी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात येईल. (संदर्भ:- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अ/४९३७/उच्चशिक्षण प्रो.यो./१३९/(१७)/२०१९, दि.३०/०१/२०१९)

**(२)** १) भारतीय प्रबंध संस्था (IIM), २) सर्व नॅशनल लॉ स्कुल्स व ३) सर्व राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था (NIT) व जेथे सामायिक प्रवेश परिक्षेद्वारे प्रथम प्रवेश घेतला आहे असे भारतातील कोणतेही दंत महाविद्यालय (BDS) या शिक्षण संस्थांमध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या पाल्यास रु. २५,०००/- इतकी रक्कम **"शिष्यवृत्ती अनुदान" (स्कॉलरशीप)** देण्यात येईल. (परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/उच्च शिक्षण -प्रो.यो/१३९(१७)/२०१८, दि. ०१/०१/२०१८)

**(३)** १. वैद्यकिय (M.D., M.S.), २. अभियांत्रिकी (M.E., M.Tech.) ३) विधी अभ्यासक्रम (L.L.M.) ४. व्यवसाय व्यवस्थापन (M.B.A., C.A. / C.S. / Cost Accountancy (From I.C.W.A.), M.C.A.) यापैकी कोणत्याही शासन मान्य शिक्षण संस्थेतून पूर्ण केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या यशस्वी पुर्ततेनंतर रु.२५,०००/- विशेष **"शिष्यवृत्ती अनुदान" (स्कॉलरशीप)** देण्यात येईल. (संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/ उच्चशिक्षण-प्रो.यो./०२/२०१८, दि.१४/०२/२०१८)

**(४)** M.Sc Agri. व M-Pharma या अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतलेल्या पाल्यास रु.१५,०००/- इतकी रक्कम **"शिष्यवृत्ती अनुदान" (स्कॉलरशीप)** देण्यात येईल. (दि.१४/०६/२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पोमसं/डी २८ अे/०३८/१/२०२४, दि.०५/०७/२०२४)

**(ब)(३) शैक्षणिक अग्रिम:-**

**(१)** पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी ते गट-ड चे कर्मचारी यांच्या दोन पाल्यांकरिता नियम (ब)(२) मध्ये नमूद केलेल्या शिक्षण संस्थांसह बी.टेक/ बी.ए.एम.एस./ बी.एच.एम.एस./ इतर मॅनेजमेंट कॉलेज, बी.सी.ए. / एम.सी.ए. अशाप्रकारचे व त्या समकक्ष इतर महत्त्वाचे शिक्षण घेत असलेल्या शासनमान्य अभियांत्रिकी / वैद्यकिय तसेच प्रबंध संस्थांमध्ये आणि शासनमान्य व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी कर्जस्वरुपात शिक्षणासाठी वार्षिक ट्युशन फी स्वरुपात भराव्या लागणा-या फी एवढी रक्कम रु.७५,०००/ (रुपये पंच्याहत्तर हजार फक्त) "**शैक्षणिक अग्रिम**" म्हणून देण्यात येईल.

**(२)** सदरहु "**शैक्षणिक अग्रिम**" वार्षिक कमाल मर्यादेत, १२ मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करण्याच्या अटीवर देण्यात येईल.

**(३)** कर्जस्वरुपात घेतलेल्या रकमेची परतफेड केल्यानंतर संबंधित पाल्याने त्या कोर्समध्ये गुणवत्ता प्राप्त केल्यास (शैक्षणिक सत्रात ६०% पेक्षा जास्त गुण मिळवल्यास व पाल्यांना आवश्यकता भासल्यास) परत रु.७५,०००/- शैक्षणिक कर्ज म्हणून (त्याच अटींवर) देण्यास पात्र राहतील.

(**संदर्भ:-** परिपत्रक क्र.पोमसं/२८-ए/४९३७/उच्च शिक्षण - प्रो.यो/१३९/२०१६, दि.१९/०९/२०१६, परिपत्रक क्र.पोमसं/२८-अ/४९३७/मोपोकनि-बैठक/४३९/२००५, दि.१३/०४/२०२३)

**(ब) ४)** **एकलव्य योजना - उद्योजकता व कौशल्य विकास योजना :-**

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक तसेच लिपिक वर्गीय (कनिष्ठ श्रेणी लिपिक ते प्रमुख लिपिक) ते वर्ग-४ कर्मचा-यांच्या पती / पत्नीला व त्यांचे १८ वर्षावरील पाल्यांना नवीन लघुउद्योग सुरु करण्यासाठी अग्रीम तत्वावर परतफेडीच्या अटीवर कमाल बिनव्याजी रू.१,००,०००/- इतके (रूपये एक लाख इतके) अग्रीम भांडवल सन २०२२-२३ या वर्षापासून खालील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार मंजुर करण्यात येईल.

| तपशिल | दरवर्षी किमान अर्जदार संख्या | पोलीस अंमलदार संख्या | लिपिक संख्या (क.श्रे.लि. ते प्र.लि.) | वर्ग-४ संख्या | एकुण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| पोलीस आयुक्त | १५ | १३ | १ | १ | १५ |
| पोलीस अधीक्षक | १० | ८ | १ | १ | १० |

या योजनेसाठी वितरीत करावयाचा निधी प्रथमत: घटक पोलीस कल्याण निधीमधून वितरित केला जाईल व त्याची प्रतिपुर्ती घटक प्रमुखांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास अहवाल पाठविल्यानंतर मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधून घटक कल्याण निधीमध्ये केली जाईल. (संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/२८-ए/४९३७/उद्योजकता व कौशल्य विकास योजना/७९/२०१८, दि. ३०/०५/२०१८ आणि परिपत्रक क्र. पोमसं/२८-ए/४९३७/ उद्योजकता व कौशल्य विकास योजना/७९/२०१८, दि.३०/०३/२०२२)

**(क)** **अंत्यविधी अनुदान :-**

पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या परंतु पोलीस विभागात सेवेत असताना मृत पावलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या पत्नी/ पतीला/ जवळच्या नातलगाला अंत्यविधीचा खर्च भागविण्यासाठी रु.२०,०००/- (अक्षरी रू. वीस हजार मात्र) इतक्या रक्कमेचे **"अंत्यविधी अनुदान"** देण्यात येईल. तसेच त्यांच्या मूळ गावी, शव पोहचविण्यासाठी पोलीस वाहनांचा उपयोग केला असल्यास, त्या वाहनासाठी केलेल्या इंधनाचा व इतर खर्च संबंधित घटकातील मोटार परिवहन विभागाकडून केला जाईल. (संदर्भ :-परिपत्रक क्र.पोमसं/२८-ए/४९३७/ मपोकनि-बैठक/४३९/२००५, दि.३०/१२/२०१४ **आणि** समक्रमांकित, दि.१३/०४/२०२३)

(ड) **सानुग्रह अनुदान** :-

(१) सेवेत असतांना, आपले कर्तव्य बजावत असतांना किंवा, अन्यथा मरण पावलेल्या पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाच्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या कुटूंबियांना शासनाकडून सानुग्रह अनुदान खालील विवरणपत्रात दर्शविलेल्या दरांप्रमाणे सानुग्रह अनुदान दिले जाईल.

| **अ. क्र.** | **पदनाम** | **सानुग्रह अनुदान (रु.)** | | | **१९ वर्षाखालील ३ मुलांपर्यंत प्रत्येकी सानुग्रह अनुदान (रु.)** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९.७.१९७५ ते १४.९.२००५ पर्यंत | १५.९.२००५ ते २९.७.२०१२ पर्यंत | ३०.७.२०१२ पासून | १९.७.१९७५ ते १४.९.२००५ पर्यंत | १५.९.२००५ ते २९.७.२०१२ पर्यंत | ३०.७.२०१२ पासून |
| १. | पो.नि./ स.पो.नि. | रू.४,०००/- | रू.१५,०००/- | रू.३०,०००/- | रू.३००/- | रू.५००/- | रू.१,०००/- |
| २. | पो.उप.नि. | रू.३,५००/- | रू.१२,५००/- | रू.२५,०००/- | रू.३००/- | रू.५००/- | रू.१,०००/- |
| ३. | स.पो.उप.नि. | रू.३,०००/- | रू.१०,०००/- | रू.२०,०००/- | रू.२५०/- | रू.४००/- | रू.८००/- |
| ४. | पो.शि. ते पो.हवा. | रू.२,५००/- | रू.१०,०००/- | रू.२०,०००/- | रू.२५०/- | रू.४००/- | रू.८००/- |
| ५. | कर्तव्य बजावितांना मृत्यू आल्यास **(पो.नि. ते पो.शि.)** | रू.५,०००/- | रू.१५,०००/- | रू.५०,०००/- | रू.निरंक | रू.५०० | रू.१,०००/- |

(२) सदरहु सानुग्रह अनुदानाची रक्कम प्रथमत: संबंधित घटकाच्या घटक पोलीस कल्याण निधीतून देण्यात येईल.

(३) या प्रांरभिक खर्चाची, पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांना शासनाने त्या वर्षासाठी मंजूर केलेल्या सहाय्यक अनुदानातुन प्रतिपूर्ती केली जाईल.

मात्र त्यासाठी संबंधीत घटकाद्वारे त्याबाबतचा प्रस्ताव घटनेच्या १ महिन्याचे आत पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

(संदर्भ:- शा. नि., गृहविभाग क्र.पीडब्ल्युएफ-०४०१/३१९/प्र.क्र.३/पोल-७, दि.१५/०९/२००५)

(४) सानुग्रह अनुदानाचा खर्च घटक पोलीस कल्याण निधी अथवा मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीतून खर्च होत नसून शासनाच्या मंजूर अनुदानातून केला जातो. त्यामूळे त्यांचा पोलीस कल्याण निधीचा सभासद असल्याबाबतचा संबंध नसल्याने लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी व गट-ड चे कर्मचारी हे पोलीस कल्याण निधीचे सभासद असले तरीही त्यांच्या कुटूंबियांना सदरचे सानुग्रह अनुदान देय नाही.

(संदर्भ:- ज्ञापन क्र.पोमसं/२८-अ/४९३७/मपोकनिस बैठक-सानु.अनुदान/४३९/२००५, दि.१६/०३/२०२२)

(इ) **पोलीस कल्याणकारी उपक्रम** :-

(१) निधीच्या सदस्य व त्यांच्या कुटुंबियांसाठी **पोलीस महासंचालकांच्या पूर्वसंमतीने** रुग्णालये, दवाखाने, चिकित्सालय, प्रसुतिगृहे, कुटूंब नियोजन केंद्र, आरोग्य साधने, बालक मंदिरे, विश्रांतीगृह, पोलीस क्लब/ पोलीस कॅन्टीन/उपहारगृह/ क्षेत्रवस्तीगृहे/बहुउद्देशीय सभागृहे/

मंगल कार्यालय / लॉन /स्वीमींग पुल/ खेळाची मैदाने / पाळणाघर / शाळा (पोलीस पब्लीक स्कुल) इत्यादि बांधणे / तयार करणे व चालविणे, इत्यादी सुखसोयी, अस्तित्वात असलेल्या इंधन आगाराची दुरुस्ती / देखभाल तसेच पोलीस कल्याण निधी मंडळाचे अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई वेळोवेळी संमत करतील असे **उपक्रम राबविले जातील.**

**(२)** यातील शाळकरी मुलांसाठी वाहनांची सोय करण्याबाबतचा पहिला परिच्छेद वगळण्यात आलेला आहे. (दि.१३/०८/२०१३ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/ मपोकनिबै-इ-१२/४३९/२००५, दि.०९/१०/२०१३)

**(३)** **स्कुल बस खरेदी** :-

समादेशक, रारापोबल, गट १, पुणे / गट ५, दौंड / गट ६, धुळे / गट ९, अमरावती / गट १२, हिंगोली / गट १४, (भाराब), औरंगाबाद आणि प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, खंडाळा व नानवीज दौंड यांच्या विनंतीनुसार ज्या घटक प्रमुखांना त्यांची कार्यालये संबंधित शहरापासून दुर अंतरावर कार्यान्वित असल्याने, किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव त्यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी / कर्मचा-यांची मुले / मुलींची गैरसोय होवू नये म्हणून स्कुल बसची नितांत गरज आहे असे वाटते, त्या घटक प्रमुखांना त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीमधून त्यासाठी या कार्यालयाचे दि.२२/०७/२०१४ च्या ज्ञापनातील खालील अटींनुसार स्वतंत्र बस खरेदी करण्यात येईल.

- ती बस, महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार व परिवहन प्राधिकरणाच्या (RTA) सुधारित मार्गदर्शक तत्वांनुसार व इतर आवश्यक बाबींची पुर्तता करुन पुर्णत: केवळ स्कुलबसमध्ये परिवर्तीत करावी.
- बसचा वापर केवळ शाळकरी मुलांसाठी शाळेत जाण्या-येण्याकरिता करावा.

**(४)** **निधी सदस्यांच्या मुलांसाठी इतर सुखसोयी** :-

सदस्याच्या मुलांसाठी अभ्यासिका, बालोद्याने, शाळकरी मुलांना मोफत दुध पुरवठा, मनोरंजन केंद्र, वाचनालये, रेडिओ व दूरदर्शन संच, ध्वनीवर्धक, पाण्याच्या टाक्या, जलशीतक यासारख्या सुखसोयी, मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळाकडुन, प्रस्तावित आणि संमत केल्या जातील, अशा इतर सुखसोयी पुरविल्या जातील.

**(५)** **महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत अनुदान** :-

पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या पोलीस कर्मचा-यांना तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले कनिष्ठ श्रेणी लिपिक ते प्रमुख लिपिक व वर्ग-ड चे कर्मचारी, यापैकी मंजुर रजा कालावधीत जे कर्मचारी महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत घेतात त्यांना घटक पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी रु.१,०००/- (रूपये एक हजार मात्र) एक रकमी अनुदान म्हणून देण्यात येईल. (संदर्भ:-परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/

पो.कर्म.महा.दर्शन/१८४(१६)/२०१७, दि.१८/०२/२०१७ व क्र.पोमसं/२८-अे/४९३७/महाराष्ट्र दर्शन/स.पो.उ.नि. ते पो.शि./१८४(१६)/२०१७, दि.०८/०९/२०१७)

**(६) सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभाचे आयोजन:-**

१. सेवानिवृत्तीचा निरोप समारंभ त्या महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी आयोजित करण्यात यावा.

२. सेवानिवृत्तीचा निरोप समारंभासाठी संबंधित घटक प्रमुख यांनी स्वत: कार्यक्रमास उपस्थित रहावे. त्यादिवशी शक्यतो दौरे / बैठका इत्यादी आयोजित करू नये.

३. सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटूंबियांस देखील सेवानिवृत्तीच्या निरोप समारंभासाठी संबंधित शाखेने आमंत्रित करावे.

४. सेवानिवृत्त होणाऱ्या व्यक्तीने त्यांच्या इतर काही नातेवाईक यांना या कार्यक्रमास बोलविण्याकरिता इच्छा व्यक्त केल्यास शक्य असल्यास त्यांनाही बोलविण्यात यावे.

५. स्वेच्छेने / नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार तसेच मंत्रालयीन अधिकारी / कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीच्या १ वर्षापुर्वीच त्यांचे सेवानिवृत्ती विषयक सर्व कागदपत्रांची कार्यवाही सुरू करावी व सेवानिवृत्तीच्या दिवशी सर्व लाभ निवृत्तीधारकास प्रदान करावेत.

६. सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी पुरूष असल्यास त्यांच्या पत्नीस रक्कम रू.१५००/- पर्यंत किंमतीची भेटवस्तू (साडी) देण्यात यावी व सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी महिला असल्यास त्यांच्या पतीस रक्कम रू.१५००/- पर्यंत किंमतीची भेटवस्तू (शर्टपीस) देण्यात यावी.

७. सेवानिवृत्तीधारकास शाल, श्रीफळ, झाडाचे रोपटे, तसेच पोलीस महासंचालक कार्यालयाकडून तयार करण्यात आलेले स्मृतिचिन्ह तसेच पोलीस महासंचालक यांचे शुभेच्छा पत्र देण्यात यावे. (**शुभेच्छा पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे.**)

८. निवृत्तीधारकास त्यांच्या घटकातील सर्व दर्जाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना पुष्पहार घालून त्यांचा सत्कार करावा.

९. सेवानिवृत्ती निरोप समारंभ समाप्तीनंतर सर्व उपस्थितांकरिता अल्पोपहार व चहापाणी यांची व्यवस्था करण्यात यावी.

१०. पोलीस महासंचालक यांचेकडून एक स्मृतिचिन्ह (Memorablia) Crystal World Awards, Add:- ६० Feet Main Road Signal, Towards Mahim Bridge, Above Taiba Leather, Mahim (East), Dharavi, Mumbai ४०० ०१७ (मोबाईल नंबर ९९८७५०९९८१ / ९००४५६०४४४) या पुरवठादाराकडून वेळोवेळी प्राप्त करून घेऊन निवृत्तीधारकास प्रदान करण्यात यावे. (किंमत रू.९००/- प्रति स्मृतिचिन्ह) या व्यतिरिक्त

घटकाकडून देण्यात येणारे स्मृतिचिन्ह त्या त्या घटक प्रमुखांनी त्यांचे स्तरावर ठरवून प्रदान करावे.

११. सेवानिवृत्ती समारंभाला येण्यासाठी तसेच परत घरी जाण्यासाठी निवृत्तीधारक व त्यांच्या कुटूंबियांकरिता कार्यालयीन वाहनाची व्यवस्था करावी.

१२. सदरचे कार्यक्रम हे योग्य रित्या आयोजित केले जाईल याकडे सर्व घटक प्रमुखांनी जातीने लक्ष द्यावे.

**(परिपत्रक क्र.DGP-D२८A०३६/२/२०२३-DESK२८A, दि.०२/०७/२०२४)**

**(फ) <u>घटकांनी उपक्रम निर्माण करून त्यांचे परिरक्षण करणे</u>** :-

संबंधित घटकांनी केवळ निधीच्या सदस्यांसाठीच म्हणून पोलीस कल्याण निधी अंतर्गत पोलीस क्लब आणि इतर तत्सम सुखसोयी निर्माण करणे व त्यांचे परिरक्षण करणे.

**(ग) <u>डॉक्टरांना मानधन देणे</u>** :-

पोलीस कल्याण निधीअंतर्गत चालवण्यात येणारी पोलीस रुग्णालये व प्रसुतिगृहे किंवा दवाखाने यामध्ये पोलीस विभागातील कर्मचाऱ्यांवर व त्यांच्या कुटूंबियांवर उपचार करणा-या डॉक्टरांना मानधन देण्यात येईल.

**(ह) <u>कला, साहित्य, क्रिडा व खेळ यासाठी मानधन</u>** :-

निधीच्या सदस्यांना व त्यांच्या पाल्यांना घटक पोलीस कल्याण निधीतून क्रिडा साहित्य उपलब्ध करून देता येईल. तसेच निधीच्या सदस्यांना कला, साहित्य, क्रिडा व खेळ यासाठी प्रोत्साहन व उत्तेजन या प्रयोजनास्तव, संबंधित घटक पोलीस कल्याण निधीमधून संबंधित घटकांच्या गरजेनुसार व उपलब्धतेनुसार खालील बाबींकरिता निधी उपलब्ध करुन देता येईल.

**(१)** क्रिडा व खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी, खास शिक्षक, प्रशिक्षक व इतर क्रिडा अधिकारी / कर्मचारी यांना मानधन देण्यासाठी, यूनिट, परिक्षेत्र व राज्य पातळीवर पोलीस क्रिडा व खेळ आयोजित करण्यासाठी.

**(२)** कला, साहित्य, क्रिडा व खेळ यात भाग घेण्यास चमू (महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर किंवा देशाबाहेर) पाठविण्यासाठी.

**(३)** परंतु जिल्हा/राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पातळीवर कला, साहित्य, क्रिडा व खेळ आयोजित करणे किंवा घटकांच्या अधिकारक्षेत्राबाहेरील खेळात भाग घेण्यासाठी चमू / खेळाडू देशांतर्गत किंवा देशाबाहेर पाठविणे ह्या गोष्टी पोलीस महासंचालक यांच्या पूर्व मान्यतेशिवाय करता येणार नाहीत.

(परिपत्रक क्र. क्र.पोमसं/२८-अ/४९३७/मोपोकनि-बैठक/४३९/२००५, दि.१३/०४/२०२३)

**(आय) <u>शिवण यंत्र</u>**:-

निधीच्या सदस्यांना शिवणयंत्रे खरेदी करण्यासाठी किंवा त्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता किफायतशीर उपक्रम सुरू करण्यासाठी कर्ज देणे, परंतू ते उपक्रम शासकिय कर्मचा-यांच्या सध्याच्या वर्तणूक नियमावली अन्वये अनुज्ञेय असले पाहिजे.

**(जे) सुसंघटीत लघुउद्योग व तत्सम प्रकल्प :-**

सदस्यांचे कुटूंबिय व इतर यांना नोकरी करता येईल, असे सुसंघटीत लघुउद्योग व तत्सम प्रकल्प घटक मुख्यालयाच्या व इतर ठिकाणी सूरु करता येतील. परंतु त्याबाबत खालील नमूद बाबींची काळजी घ्यावी.

- निधीतून चालू करण्यात आलेल्या उपक्रमाच्या बाबतीत ते योग्य त-हेने पार पाडण्यात यावेत.
- त्यांचा हिशेब अंतर्गत व बाहेरील लेखा परिक्षकांकडून तपासण्यात यावा.
- खर्च, घसारा इत्यादीसाठी तरतूद केल्यानंतर अशा उपक्रमातून होणारा नफा निधीमध्ये जमा करण्यात यावा.

**(के) वित्तीय अधिकार** :-

नियम ९ (१) (अ) ते (जे) मध्ये नेमून दिल्यानुसार, प्रत्येक बाबतीत रक्कम खर्च करण्यासाठी खालीलप्रमाणे वित्तीय अधिकार प्रत्यायोजित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | प्राधिकाऱ्याचे नाव | वित्तीय मर्यादा |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक/ समादेशक / प्राचार्य / समकक्ष दर्जाचे घटक प्रमुख | रू.५,००,०००/- |
| २. | परिक्षेत्रिय वि.पो.म.नि. / पो.उ.म.नि./ तसेच वि.पो.म.नि./ पो.उ.म.नि. दर्जाचे घटक प्रमुख व वि.पो.म.नि.(प्रशासन), म.राज्य, मुंबई. | रू.१०,००,०००/- |
| ३. | अपर पोलीस महासंचालक दर्जाचे आयुक्त / पोलीस आयुक्त / संचालक व घटक प्रमुख व अ.पो.म.सं.(प्रशासन), म. राज्य, मुंबई. | रू.१५,००,०००/- |
| ४. | पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई. | पूर्ण अधिकार |

(संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/वित्तीय मर्यादा/४३९/२००५, दि.२२/०१/२०२१)

**(एल) निराश्रित सेवानिवृत्त पोलीस शिपायांना ठोक रक्कम**:-

अनेक सेवानिवृत्त पोलीस शिपायांना मुले नसतात किंवा जवळचे नातेवाईक नसतात आणि त्यामुळे त्यांनी फक्त निवृत्तीवेतनावर आणि सेवानिवृत्तीनंतर मिळणा-या इतर निवृत्ती वेतन लाभावर अवलंबून रहावे लागते. त्यापैकी काही जणांकडे त्यांच्या वार्धक्यात कोणतेही उत्पन्नाचे साधन नसते आणि त्यामुळे औषधे इत्यादींचा खर्च करणे व तो भागविणे फारच कठिण जाते. म्हणून लायक व अन्यथा निराश्रित असतील, अशा सेवानिवृत्त पोलीसांना त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीतून अधिकतम रुपये ५,०००/- पर्यंतची ठोक रक्कम घटक प्रमुख देऊ शकतात. तथापि, ही रक्कम प्रत्येकांच्या बाबतीत फक्त एकदाच देण्यात येईल.

**(एम) तत्सम व्यवसाय** :-

भाज्या व फुलांच्या बागा, फळबागा, शेतमळे, वस्तूभांडारे, पिठाच्या गिरण्या, धान्याची दूकाने, कुक्कूट पैदास क्षेत्रे, दुग्ध शाळा, इंधन आगारे,(फक्त सध्या अस्तित्वात असलेले पेट्रोल पंप आणि गॅस एजन्सी, बेकऱ्या आणि पोलीस कल्याण निधीची साधन संपत्ती ज्यामुळे वाढेल असे तत्सम व्यवसाय चालवणे.

**(एन) तत्सम व्यवसाय यांचे प्रशिक्षण वर्ग** :-

सदस्य व त्यांचे कुटूंबिय यांच्या हितासाठी शिवणकाम, हस्तव्यवसाय, हवाबंदकरण, सुतारकाम व तत्सम व्यवसाय यांचे प्रशिक्षण वर्ग चालविणे.

**(२) निधीतून सदस्यांना पुढील अपवादात्मक प्रसंगी अग्रिम देता येतील :-**

**(अ) प्रवासभत्ता अग्रिम** :-

कर्तव्यासाठी म्हणून ब-याच मोठया संख्येने पोलीस शिपायांना तात्काळ बाहेर पाठविणे भाग असते आणि जेव्हा कोषागारातून किंवा स्थायी अग्रिमातून (Permenant advance) प्रवासभत्ता अग्रिम देणे शक्य नसते, अशा अत्यंत निकडीच्या प्रसंगी निधीतून देता येईल. तथापि कोषागारातून प्रवासखर्च अग्रिम काढल्यानंतर लगेच त्यांची प्रतिपूर्ती केली जाईल, असे अग्रिम अपवाद म्हणून दिले जाईल. नियम म्हणून नाही.

**(ब) वैद्यकीय अग्रिम:-**

**(१)** क्षयरोग, कर्करोग, पोलिओ, अर्धांगवायू, पक्षाघात, फुफ्फुस / हृदयविकार / मेंदू / किडणीशी संबंधीत आजार, एचआयव्ही पॉझीटीव्ह, कॉक्लीयर इम्प्लांट व इतर सर्व भविष्यातील संभाव्य अज्ञात गंभीर आजार झालेल्या पोलीस कल्याण निधींच्या सदस्यांना (पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेबाबतीत शासन मान्य महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेमध्ये अंतर्भुत नसलेले सर्व गंभीर आजार), पोलीस कल्याण निधी नियमातील वित्तीय प्राधिकारानुसार खालील अटींवर अग्रिम देता येईल.

(दि.२४/११/२०१४ च्या बैठकीतील निर्णय आणि या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/ ४९३७/ मपोकनिबै/४३९/२००५, दि.१२/०५/२०१५ आणि सम क्र., दि.१३/०४/२०२३).

**(अ)** एक अग्रीम/कर्जाची पुर्णपणे परतफेड झाल्याशिवाय दुसरे अग्रीम / कर्ज देता येणार नाही.

**(ब)** वैद्यकिय प्रतिपूर्ती बिले पास होताच, अशी अग्रिमे संपूर्णत: वसूल केली जातील. मात्र कोणत्याही कारणास्तव प्रतिपूर्तीद्वारे विहित कालावधीत परतफेड न झाल्यास संबंधीत अग्रीमधारकांच्या वेतनातून अग्रीम रक्कम, व्याजासह वसूल केली जाईल.

**(क)** आत्यंतिक अनुकंपा म्हणून एखाद्या सदस्याला घटक निधी प्रशासक हे त्यांच्या वित्तिय प्राधिकारानुसार अग्रीम मंजूर करु शकेल.

**(ड)** सदरचे अग्रीम ३० महिन्यापर्यंत बिनव्याजी असेल. तसेच अग्रीमाची वसुली अग्रीम मंजूरीच्या ६ महिन्यांनंतर संबंधित अग्रीम धारकाच्या वेतनातून कपात करण्यास सुरुवात करावी. त्यानंतरच्या कालावधीत परतफेड करावयाच्या कर्जाच्या रकमेवर द.सा.द.शे. १०% दराने व्याज आकारण्यात येईल. तसेच वैद्यकीय अग्रिम मंजूर करत असतांना सदर पोलीस कल्याण निधीचा सभासद यांच कमीत कमी ३ वर्षे सेवा कालावधी शिल्लक असावा अथवा ३ वर्षे सेवा शिल्लक नसल्यास संबंधित पोलीस कल्याण निधीचा सभासद यांच्या भविष्य निर्वाह निधी किंवा उपदान मधून वैद्यकीय अग्रिमाची रक्कम वसुल करण्यात येईल ही अट ठेवण्यात यावी. (दि.१४/०६/२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पोमसं/डी २८ अे/०३८/१/२०२४, दि.०५/०७/२०२४)

**(३) <u>वैद्यकीय अग्रिम क्षमापित तरतुद</u>:-**

पोलीस कल्याण निधीचा सदस्य असलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी / लिपिक वर्गीय अधिकारी / कर्मचारी व गट-ड चा कर्मचारी उपचार घेत असतांना मृत्यू पावल्यास त्या अधिकारी कर्मचा-यास वैद्यकिय उपचाराकरिता पोलीस कल्याण निधीतून दिलेल्या वैद्यकिय अग्रीमाची रक्कम ज्यावेळी प्रतिपुर्तीने प्राप्त केली जाईल, त्यावेळी दिलेले अग्रीम आणि प्रतिपुर्तीची रक्कम यामधील जी फरकाची रक्कम आहे ती रक्कम क्षमापित करण्यात येईल.

(संदर्भ :- परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस-बैठक/४३९(०५)/२०१५, दि.०७/०४/२०१६ )

**(४) <u>अनुकंपा तत्वावर अग्रिमाची रक्कम आर्थिक सहाय्य / निर्लेखित करण्याची तरतुद</u>** :-

या नियमाच्या पोटनियम (१) च्या खंड (अ) व (ब) मध्ये उल्लेखिलेल्या ज्या वैद्यकिय व शैक्षणिक सुविधांसाठी अग्रीम/कर्ज अनुज्ञेय आहे, त्यासाठी मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळ अध्यक्ष, वेळोवेळी सर्वसाधारण आदेशाद्वारे किंवा एखाद्या प्रकरणी विशेष आदेशाद्वारे नेमून देईल, अशा निर्बधांच्या अधीनतेने, निधीतून कर्जा एवढी रक्कम अनुदानाच्या रुपात आर्थिक सहाय्य म्हणून देऊ शकेल किंवा काही अपवादात्मक परिस्थितीत आत्यंतिक अनुकंपा म्हणून तेवढी रक्कम किंवा त्यावरील व्याजाची रक्कम निर्लेखित करु शकेल.

**(४-ब)** पोलीस कल्याण निधीच्या सभासदांना पोलीस कल्याण निधीमधून अग्रिम मंजूर करताना त्यांना मिळत असलेल्या एकूण वेतनाचा विचार करण्यात येईल. व अग्रिम मंजूर केल्यास त्यांच्या वेतनातून ६०% पेक्षा जास्त रक्कमेची कपात होणार असेल तर त्यास पोलीस कल्याण निधीमधून कोणतेही अग्रिम देय होणार नाही. (क्र.पोमसं/२८-अ/४९३७/नवीन योजना/१६२(२०१८)/२०१९, दि.२१/०३/२०१९)

**(५) <u>पोलीस कल्याण निधीच्या सदस्यांना उपक्रमांतर्गत मिळणाऱ्या सोयी-सुविधा</u>:-**

**(अ)** पोलीस निरीक्षक व त्याखालील दर्जाचे अधिकारी/ कर्मचारी तसेच उपसहायक व त्याखालील दर्जाचे मंत्रालयीन अधिकारी / कर्मचारी हे निधीचे फायदे घेण्यास पात्र राहतील. तसेच पोलीस उप अधीक्षक या पदावरील एक टप्पा पदोन्नतीवर असलेले पोलीस निरीक्षक यांना जोपर्यंत पोलीस उप अधीक्षक / सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर नियमित पदोन्नती मिळत नाही, तोपर्यंत त्यांनाही उपरोक्त उपक्रमांतर्गत मिळणाऱ्या सर्व सोयी सुविधा अनुज्ञेय असतील.

**(ब)** **पोलीस निरीक्षक पेक्षा वरील दर्जाचे पोलीस कल्याण निधीचे सर्व सभासद** हे फक्त पोलीस क्लब, हॉलिडे होम, कक्षबंध, इत्यादी ठिकाणी भाडयाने सवलतीचे दर आणि सेवा आकार देऊन राहणे या गोष्टी वगळता, निधीतून **वर उल्लेखिलेल्या सुखसोयी व सुविधांचा लाभ घेण्यास पात्र असणार नाहीत.**

**(६) <u>पोलीस कल्याण सप्ताह</u> :-**

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात राबविण्यात येणाऱ्या पोलीस कल्याण योजनेबाबत जागरुकता निर्माण होण्याकरिता राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये दरवर्षी जुन महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पोलीस कल्याण सप्ताह साजरा करण्यात येईल.

(७) <u>सिंकींग फंड</u> :-

पोलीस कल्याण निधी अंतर्गत बांधण्यात येणा-या इमारती / वास्तुंच्या दुरुस्तीकरिता प्रकल्प खर्चाच्या १०% निधी इतका सिंकींग फंड तयार करण्यात येईल व त्याकरिता पोलीस कल्याण निधीच्या मासिक उत्पन्नातुन १०% सिंकींग फंडामध्ये जमा करावा.

**१० <u>निधीचे लेखे, लेखापरिक्षा, अभिलेख, नोंदवह्या, मानधन इत्यादी</u> :-**

**(१)** पोलीस महासंचालक, अभिलेख व नोंदवहया ठेवण्याबाबतचे नियम विहित करुन लेखांकनाची व लेखापरिक्षणाची पध्दत आणि त्यासाठी नियुक्त करण्यात येईल, त्या कर्मचाऱ्यांना द्यावयाचे मानधन विहित करुन, निधीच्या यथोचित कारभारासाठी वेळोवेळी योग्य ते आदेश देतील.

**(२)** घटक मुख्यालयात जडवस्तुसंग्रह नोंदवही व रोकड वही ठेवली जाईल. उप-घटक मुख्यालयात वेगळी रोकडवही ठेवण्यांत येईल.

**(३)** पोलीस कल्याण निधीतून केले जाणारे व्यवहार शासकिय व्यवहारापासून वेगळे ठेवण्यांत येतील.

**(४)** घटक मुख्यालयामध्ये आणि पोलीस ठाण्यांसारख्या उप-घटकामध्ये ठेवलेले लेखे, अभिलेख व नोंदवह्या, निरीक्षक अधिका-यांकडून त्यांच्या वार्षिक तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. <u>प्रत्येक घटक पोलीस कल्याण निधीतील संपुर्ण लेख्यांची वार्षिक तपासणी करुन, त्याबाबतचा अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्याची जबाबदारी ही संपुर्णत: संबंधीत घटक प्रमुखांची राहील.</u>

**(५)** मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी आणि घटक पोलीस कल्याण निधी यांचे लेखे महालेखापाल, महाराष्ट्र यांच्या बाह्य लेखापरिक्षा विभागांकडून तपासण्यात येतील.

**(६)** पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयात रोखपाल म्हणून काम करणारा लिपीक मध्यवर्ती पो.क.निधीचे लेखे ठेवील आणि त्यासाठी त्याला निधीतून दरमहा रु.१,०००/- इतके मानधन देण्यांत येईल.

**(७)** घटक पोलीस कल्याण निधीचे लेखे घटक कार्यालयाच्या लेखा शाखेद्वारे सोयीनुसार ठेवले जातील व लेखापाल व त्यांचा १ सहाय्यक यांना निधीतून दरमहा प्रत्येकी रु.१,०००/- इतके मानधन देण्यात येईल.

**(८)** तसेच निधीच्या प्रशासनाबाबतचे काम करणाऱ्या लिपीकाला पोलीस कल्याण निधीतून खालीलप्रमाणे मानधन देण्यात येईल :-

**(अ) पोलीस महांचालक यांचे कार्यालय :-**

(१) पोलीस कल्याण निधी शाखेचे कार्यासन अधिकारी - दरमहा रुपये १,०००/-

(२) पोलीस कल्याण निधी शाखेतील १ लिपीक - दरमहा रुपये १,०००/-

**(ब) निधी अस्तित्वात असेल अशी इतर सर्व कार्यालये :-**

प्रत्येक कार्यालयातील पोलीस कल्याण निधीचे कामकाज हाताळणारे १ लिपीक किंवा १ पोलीस कर्मचारी - दरमहा रुपये १,०००/- (संदर्भ :- परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक-पु.अनुदान/४३९/२००५, दि.१६/०३/२०२२)

**(९)** घटकांच्या पोलीस कल्याण निधीचे ताळेबंद पत्रक आर्थिक वर्षानुसार दरवर्षी पोलीस नोटीस मध्ये प्रकाशित करण्यात येईल. (दि.१४/०६/२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.पोमसं/डी २८ ओ/०३८/१/२०२४, दि.०५/०७/२०२४)

## ११ पोलीस कल्याण निधी नियम तयार करण्याचे प्राधिकार :-

**(१)** मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम, २३ (घ) अंतर्गत, राज्याच्या पोलीस दलाकरीता नियम तयार करण्याचे अधिकार, पोलीस दलाच्या प्रशासनासंबधिच्या कोणत्याही प्रयोजनासाठी कोणताही निधी स्थापन करणे, त्यांची व्यवस्था पहाणे व त्यांचे विनियमन करण्याचे अधिकार हे पोलीस महासंचालक यांना शासनाने प्रदान केलेले आहेत.

**(२)** महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली ही पोलीस कर्मचा-यांचे कल्याण आणि पोलीस कल्याण निधीतील वित्तीय बाबींचे विनियमन करण्याचे उद्देशाने तयार करण्यात आलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस कल्याण मंडळ समीती बैठकीतील ठरावानुसार, पोलीस कल्याण निधीचे नियम तयार करणे, वगळणे किंवा त्यात बदल करणे हे अधिकार मंडळाचे अध्यक्ष तथा पोलीस महासंचालक यांना राहतील.

**(३)** मात्र, केलेल्या बदलांची माहिती वेळीच शासनास अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक राहील.

## १२ निरसन व व्यावृत्ती :-

**(१)** विद्यमान महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियम जेथपर्यंत या सुधारित नियमांच्या उपबंधांना प्रतिकूल किंवा विसंगत असतील तेथपर्यंत हे नियम विद्यमान नियमांना अधिभावी ठरतील.

**(२)** परंतू असे कि, विद्यमान नियमांच्या अनुरोधाने केलेली कोणतीही कृती, ती केवळ नियमांच्या उपबंधांच्या विरुध्द किंवा त्यांच्याशी विसंगत आहे म्हणून विधी अग्राह्य होणार नाही.

---ooo---

**परिशिष्ट 'अ'**

**सदस्यत्व स्वीकृती प्रतिज्ञापत्र**

मी ____________________________ (पूर्ण नाव) पोलीस कल्याण निधीची नियमावली व नियम वाचल्यानंतर व पुर्णत: समजून घेतल्यानंतर उक्त निधीत सामील होण्यास स्वेच्छेने संमती देत आहे. कल्याण निधीच्या नियमावलीत विहित केलेल्या नियमांनुसार वर्गणी देण्यास माझी संमती आहे. मी, असेही संमत करतो की, मध्यवर्ती पोलीस कल्याण मंडळ वेळोवेळी विहीत करील असे वर्गणीच्या दरांमधील कोणतेही बदल, मी स्वीकारीन, माझ्या वेतनातून दर चार महिन्यांनी, त्यावेळी माझ्याकडून देय असलेली वर्गणी कापून घेण्यास माझी अनुमती आहे. मी आणखी असेही कबूल करतो की, मी जोपर्यंत पोलीस विभागात सेवा करीत आहे, तोपर्यंत माझे सदस्यत्व मागे घेणार नाही.

**घोषित करणा-या व्यक्तीची सही**

**ठिकाण :-** **संपूर्ण नाव :-**

**दिनांक :-** **धारण केलेले पद :-**

**वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रतिस्वाक्षरी**

**परिशिष्ट- " "**

**मागणी व नोंदवही क्र........**

**वरिष्ठ अधिका-याची प्रतिस्वाक्षरी :-**

---ooo---

# परिशिष्ट 'ब'

## घटक

पोलीस ठाणे

**मागणी नोंदवही**

**३० एप्रिल २०____**

**३१ ऑगस्ट २०___**

**३१ डिसेंबर २०___** **रोजी संपणा-या चौमाहीची पोलीस कल्याण निधीसाठी वर्गणी**

| अ.क्र. | ज्यांनी वर्गणी द्यायला पाहिजे अशा व्यक्तींची नावे | धारण केलेले पद | गोळा केलेली रक्कम | | अध्यक्षांकडे भरणा केलेली रक्कम | | अदत्त रक्कम / शेरा असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पोलीस कल्याण निधी | पावती क्रं. व दिनांक | पोलीस कल्याण | अध्यक्षं ाच्या पोचपावतीचा क्र. व दिनांक | |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| ८ | | | | | | | |

---ooo---

**परिशिष्ट 'क'**

**पावती**

**पोलीस कल्याण निधी वर्गणी पावती**

श्री.____________________________ (पदनामासह) यांचेकडुन पोलीस कल्याण निधीची माहे, --------२०__ ते माहे, ---------२०__ पर्यंतच्या चौमाही कालावधीची वर्गणीची एकूण रूपये --------------------- (अक्षरी रूपये -------------------------------------------------- ) इतकी रक्कम मिळाली.

दिनांक : . .२०

वर्गणी गोळा करणा-या अधिका-यांची सही

---ooo---

## परिशिष्ट 'ड'

**कॅश मेमो**

अनुक्रमांक :-

दिनांक :-

प्रति,

अध्यक्ष,
मध्यवर्ती / घटक पोलीस कल्याण निधी समिती.

महोदय,

मी, यासोबत, पोलीस कल्याण निधीची माहे,_______२०___ ते माहे, _______२०___ या कालावधीची वर्गणी म्हणून सदस्यांकडून गोळा केलेली एकूण रुपये _________(अक्षरी रूपये _________________________________) इतकी रक्कम मध्यवर्ती/घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्यासाठी सादर करीत असून, कृपया पोच द्यावी, ही विनंती.

आपला

(सही)

---०००---

## <u>परिशिष्ट 'इ'</u>

**पोलीस कल्याण निधीच्या रक्कमेची पोचपावती :-**

जमा नोंद क्रमांक :-

दिनांक :-

श्री/श्रीमती________________________________पोलीस फौजदार / मंडळ पोलीस निरीक्षक (पदनाम) यांचेकडून पोलीस कल्याण निधीची माहे,_______२०___ ते माहे, _______२०___ या चौमाही कालावधीची वर्गणी म्हणून रुपये ________/(अक्षरी रुपये __________________________________________) इतकी रक्कम मिळाली.

रोखपाल :-

निधी प्रशासक

प्रति,
फौजदार / मंडळ पोलीस निरीक्षक.

---०००---

श्री / श्रीमती ______________________________

पोलीस दलातील प्रदिर्घ सेवा पूर्ण करून आपण दि. / /२० रोजी सन्मानाने सेवानिवृत्त होत आहात. पोलीस दलातील आपली सेवा निश्चितच इतरांना प्रेरणादायी असणार आहे. पोलीस दलासाठी आपण केलेली सेवा ही अनमोल आहे.

महाराष्ट्र पोलीस दलाची कुटुंब प्रमुख या नात्याने, आपणास सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य तणावमुक्त व आरोग्यदायी जावो, अशी ईश्वरचरणी मी प्रार्थना करते.

पुन्हा एकदा आपणास सेवानिवृत्तीनंतरच्या वाटचालीसाठी मनापासून शुभेच्छा.

आपली स्नेहांकित,

( रश्मि शुक्ला ) भा.पो.से.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.